# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५१ वा ❑ बुधवार दि.३० जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## लाडक्या बहिणींच्या यादीत पुरुष कसे?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रात सुरू झालेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' महिला सबलीकरणाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम मानला जात आहे. गरजू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आर्थिक मदत मिळावी, यासाठी ही योजना आणण्यात आली आहे. मात्र, प्रारंभिक टप्प्यातच काही ठिकाणी बनावट लाभार्थ्यांच्या या योजनेचा लाभ घेत सरकारी योजनेचा दुरुपयोग केला.ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळायला पाहिजे होता त्यांना झाला नाही.आता तर धक्कादायक माहिती समोर आली आहे.१४,२९८ पुरुषांनी लाडक्या बहिणीचा लाभ घेत सरकारला २१ कोटी ४४ लाख रुपयांचा चुना लावला. जेव्हा लाभार्थींची छाननी झाली तेव्हा हा प्रकार उघडकीस आला ऑगस्ट २०२४ मध्ये योजनेचा लाभ द्यायला सुरुवात झाली लाभार्थींच्या यादीमध्ये १४,२९८ पुरुष घुसले..या लाडक्या भावांना लाभ कोणी दिला? लाडक्या बहिणींच्या यादीत या पुरुषांना कोणी घुसविले,यासाठी जबाबदार कोण? इतका मोठा

गैरप्रकार कोणी केला? या पुरुषांनी लाडक्या बहिणी योजनेवर डल्ला मारला तो पैसा सरकार परत घेणार का?असे प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात.

विशेष म्हणजे ६५वर्षे वयावरील व्यक्तीने देखील या योजनेचा लाभ घेतलेला आहेत.६५ वर्षे वयावरील दोन लाख ८७ हजार ८०३ वयोवृद्ध महिलांनी या योजनेचा लाभ उचलला आहे त्यांना दहा महिन्यापर्यंत ४३१ कोटी ७० लाख रुपये त्यांच्या बँक खाते जमा झाले.हे लाभार्थी गाळले जातील,असे सांगण्यात येत असले तरी या लाभ घेणाऱ्यांकडून सरकार पैसे वसूल करणार का?

ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलेच्या बँक खात्यामध्ये दीड हजार रुपये जमा केले जातात. सरकारची ही एक महत्त्वकांक्षी योजना आहे, मात्र सध्या या योजनेच्या निकषात ज्या महिलांची नावं बसत नाहीत, त्या महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेऊन खऱ्या लाभार्थ्यांना वंचित ठेवले.

आचारसंहिता लागू होण्याआधी विधानसभा निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण योजना मध्यप्रदेश सरकारच्या धर्तीवर आणण्यात आली..या योजनेचा मध्यप्रदेश सरकारला फायदा झाला..या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात देखील तत्कालीन युती सरकारने ही योजना घाईने राबविली..आलेल्या अर्जांची छाननी न करता सरसकट सर्वांना या योजनेच्या माध्यमातून पैसे त्यांच्या खात्यांवर जमा करण्यात आली..याचा फायदा महायुती सरकारला झाला..मात्र या योजनेत अनेक अपात्र लोकांनी लाभ घेऊन सरकारच्या तिजोरीला चुना लावला..याला जबाबदार कोण? याची सविस्तर शहानिशा होणे आवश्यक आहे..दोषींवर कारवाई करण्याची गरज आहे.

जे लोक सरकारी योजनांचा फायदा फसव्या पद्धतीने घेत आहेत, सरकार अशा लोकांकडून पैसे वसूल करू शकते. म्हणजेच, त्यांना लाभ म्हणून घेतलेली रक्कम सरकारला परत करावी लागू शकते. खरं तर सरकारी योजनांचा दुरुपयोग करणाऱ्यांना कठोर कारवाई करण्याची गरज आहे.

सरकारी योजनांचा गैरवापर करणे ही एक गंभीर समस्या आहे ज्यामध्ये योजनांचे फायदे योग्य लोकांपर्यंत पोहोचण्याऐवजी काही लोक चुकीच्या पद्धतीने लाभ घेतात. यामुळे सरकारी प्रयत्नांचा आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय होतो आणि योजनांची उद्दिष्टे साध्य करण्यात अडथळा येतो.






# इंडियन फायर सर्व्हिसेस इंजी. सेफ्टी मॅनेजमेंट कुंभेफळ येथे कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

**कुंभेफळ** – इंडियन फायर सर्व्हिसेस इंजी. सेफ्टी मॅनेजमेंट आयटीआय, कुंभेफळ येथे कारगिल विजय दिवस मोठ्या दिमाखात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला आदित्य धाराशिवकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांमध्ये विजय दिवसाबद्दलची देशभक्तीपर भावना जागृत केली.

भारतीय सैन्याच्या शौर्यगाथा आणि त्यांचे देशावरील निस्वार्थ प्रेम विद्यार्थ्यांनी आत्मसात करून देशभक्ती जागरूक ठेवावी व सैन्याच्या बलिदानाची सदैव आठवण ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आचार्य सर यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रताप सिंग पाटील, माजी सैनिक, यांचेही भाषण झाले. त्यांनी देशासाठी केलेल्या कार्याचे अनुभव कथन केले आणि भविष्यात आपण देशासाठी काय केले पाहिजे, याबद्दल संकल्पना मांडली. तसेच, सियाचीन आणि कारगिल युद्धाबद्दल सविस्तर माहिती सांगितली.

संस्थेचे संचालक राजेंद्र खंडेलवाल यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून तो यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. याप्रसंगी महादेव चव्हाण, आयटीआयच्या प्राचार्या सौ. स्मिता वाणी, सुमेध गवळी, विश्वजित




पाटील, उफाडे सर, प्रशांत काकडे, नारायण तांबे, बळखंडे सर, धाबे सर, कुशल पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्या सौ. स्मिता वाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘‘श्रीराधाकृष्णायन‘‘ या मराठी काव्यसंग्रहाला भारत सरकारकडून कॉपीराईट प्राप्त

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या लेखणीतून साकारलेला ‘‘श्रीराधाकृष्णायन‘‘ हा मराठी काव्यसंग्रह भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाकडून अधिकृतपणे नोंदणीकृत करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या सर्व प्रकाशन आणि बौद्धिक मालकी हक्कांचे संरक्षण आता अधिकृतरित्या प्राप्त झाले आहे.

प्रेम, भक्ती, अध्यात्म आणि राधाकृष्णांच्या जीवनरसाचा सुरेल अनुभव देणाऱ्या या काव्यसंग्रहात आधुनिक शैलीत पारंपरिक भावनांचे मनोवेधक चित्रण करण्यात आले आहे.

कॉपीराईट प्राप्त झाल्यामुळे या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला आहे. लवकरच हा संग्रह वाचकांसमोर सादर होणार असून रसिक वाचकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. डॉ. चंद्रहास शास्त्री यांनी या यशाचे श्रेय राधाकृष्णांच्या कृपेला, श्रीगुरूंच्या आशीर्वादाला आणि वाचकांच्या प्रेमाला दिले आहे.






# स्वप्नपूर्तीची आनंदयात्रा.... !



शीतल गायकवाड–पुणे
(मो)९९२३१७५६२४

सुटीचा दिवस होता. नेहमीप्रमाणे मस्तपैकी ताजी भाजी आणायला दुकानात गेले. टवटवीत भाज्या आणि फळे पाहून मन एकदम प्रसन्न झालं. भरपूर भाज्या आणि फळे घेऊन, दोन पिशव्या भरून घरी आले पाहते तर काय, आमचे यजमान देवापुढे हात जोडून उभे होते आणि त्यांच्या डोळ्यात पाणी! एक क्षण मन थबकलं. काय झालं असेल? असंख्य विचार एका क्षणात मनात चमकून गेले. मी थोडीशी घाबरले, मनात भीतीचं काहूर उठलं. ‘‘अहो, काय झालं? सांगा ना!‘‘ मी विचारलं, तर ते म्हणाले, ‘‘देवाला नमस्कार कर आधी.‘‘ मी नमस्कार केला आणि पुन्हा विचारलं, ‘‘काय झालंय, पटकन सांगा!‘‘ त्यावर ते म्हणाले, ‘‘तुझा कॉलेजमध्ये पहिला नंबर आला आहे!‘‘

‘‘हुश्श!‘‘ मी सुटकेचा निश्वास टाकला. तर डोळ्यातील अश्रू आनंदाश्रू होते! मला आणि माझ्या मुलीला खूप आनंद झाला. मध्ये मी कॉलेजमध्ये पहिली आले होते. ‘‘पण कसं काय? तुम्हाला कोणी सांगितलं? कसं कळलं?‘‘ मी प्रश्नांचा भडीमार केला. ते म्हणाले, ‘‘तू फोन घरी विसरली होतीस. तुझ्या मैत्रिणीचा फोन आला होता.‘‘ मी लगेच तिला परत फोन करून विचारलं, आणि खरंच, माझं नाव नोटीस बोर्डवर लागलं होतं!

मग काय, आनंदी आनंद! घरी आई-पप्पा, बहिणी, भाऊ, सासूबाई सगळ्यांना फोन करून निकाल सांगितला. सगळ्यांनी भरभरून अभिनंदन केलं. मैत्रिणींनीही शुभेच्छा दिल्या. आमच्या यजमानांनी तर पेढेच आणले. देवाला नैवेद्य दाखवून सगळ्यांना पेढे वाटले. आम्ही सगळे पटापट आवरून कॉलेजमध्ये आणि मग मंदिरात जायला निघालो. कॉलेजमध्ये जाऊन नोटीस बोर्डवर लावलेला निकाल पुन्हा एकदा पाहिला आणि मंदिरात आलो. देवाचे आभार मानून तिथेही पेढे वाटले. क्षणभर वाटलं, देव गालातल्या गालात हसून म्हणतोय, झालं का एकदाचं तुझ्या मनासारखं? गेल्या कित्येक वर्षांत माझी देवाकडे एकच प्रार्थना असायची – देवा, माझं अर्धवट राहिलेलं शिक्षण पूर्ण होऊ दे, मला छान करिअर करायचं आहे. त्यासाठी मी हवी तेवढी मेहनत करायला तयार होते.

मंदिरात बसल्यावर मागच्या काही वर्षांचा काळ डोळ्यासमोरून सरकला. माझं लग्न मी १८ वर्षांची असताना झालं. एका वर्षात मुलगी झाली. सगळं एकदम छान सुरु होतं, पण माझ्या मनात एक सल कायम असायची की मला माझं अर्धवट राहिलेलं शिक्षण पूर्ण करायचं आहे. मुलगी थोडी मोठी झाल्यावर मी कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळवायचा प्रयत्न करू लागले. बरेच जण म्हणायचे, लग्नानंतर शिक्षण शक्य होत नाही. बऱ्याच जणांना असंही वाटायचं की एवढा छान संसार आहे, गोड मुलगी आहे, काय गरज आहे आता शिक्षण घ्यायची? उगाच नसत्या उठाठेवी! पण प्रत्येकाची भूक वेगळी असते. मला माझं शिक्षण कसल्याही परिस्थितीत पूर्ण करायचं होतं. त्याशिवाय मला चैन पडणार नव्हती. सगळ्यांचे ऐकून मनात विचारांचा कल्लोळ उठायचा... होईल का मला आता?

पण म्हणतात ना, केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे! बऱ्याच प्रयत्नांती मला कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळालं आणि माझी अडथळ्यांची शर्यत सुरू झाली. स्वतःची स्वतःशी, स्वतःचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी असलेली शर्यत...

ना किसी से ईर्षा
ना किसी से होड
मेरी अपनी मंजिले
मेरी अपनी दौड

या पंक्तीप्रमाणे माझा प्रवास चालू होता.

**(क्रमशः)**

# वासुशास्त्र पेंटिंग



आज श्रावणाचा चौथा दिवस. आपल्या लघुलेखाचाही चौथा दिवस. "ज्योतिर्मय" च्या वाचकांचा आवाका, व्याप्ती एवढी मोठी आहे की, मुंबई, पुणे, नाशिक, बेंगलोर, राजमंड्री, पिठापूरम पासून तर कॅनडा पर्यंत वाचकांचे औत्सुक्यपूर्ण फोन आले.

त्याचं कारणही तसंच आहे. हा महिना देवांचाच आहे. धार्मिक महिना आहे हा. खूप जणं म्हणजे, साधक-उपासक, श्रद्धाळु-भाविक, चाकरमाने-नोकरदार, व्यावसायिक-उद्योजक या सर्वच प्रकारची मंडळी विशेषतः त्यांच्या घरातील वयोवृद्ध महिला वर्ग तसेच गृहकार्य पार पाडणारी महिला... यांचा एका सूर असतो... "आम्ही अमूक एक जप करतो", "आम्ही ही ही पारायण करतो" "आम्हाला कुणी, ज्या ज्या पूजा सांगितल्या त्या सर्व केल्या पण कांहीच फळ मिळत नाही" किंवा "मिळालं नाही". अशा प्रकारची हतबलता त्यांच्याकडून ऐकायला मिळते. 'आम्ही काय करू?' "कर्ज, घरातील भांडणं, कोर्ट-कचेरी, अंधश्रध्देला पोषक बऱ्याच गोष्टीशी सामना करावा लागणं", "मुले टिव्ही-मोबाईल पहात बसतात अभ्यास करित नाहीत", "कांहीच कारण नसतांना घरातील वातावरण अशांत होणं", "कारण नसतांना गैरसमज होणं, आजारपण, वारंवार आजार पडणं" या व अशा अनेक अडथळे, अडचणी आणि संकटांपासून मुक्ती मिळावी यासाठी 'पूजापाठ', 'व्रतवैकल्ये, "जपानुष्ठानं "पारायणं, असे अनेक सात्त्विक आणि तांत्रिक प्रयोग,उपाय, उपचार म्हणून केले जातात, परंतु म्हणावा तसा फरक पडत नाही.

अशा या समस्त, बांधवांना, वाचक परिवारांस एक विश्वास, द्यावासा वाटतो की, आपण खूप मोठे भाग्यवान नाहीत की आपणांस देवतांचे दर्शन होईल..!! मात्र आपण निश्चितच नशिबवान आहोत कारण आपणांस सर्व प्रकारचे रंग दिसतात, आकार दिसतात, चिन्ह दिसतात, प्रतिके दिसतात आणि या साऱ्यांच्या एकत्रित संकल्पनाला सुध्दा आपण नैसर्गिक डोळ्यांनी पाहु शकतो. हेच पाहणं जर विश्वासपूर्ण, निष्ठायुक्त आणि आणि श्रध्देने असेल तर "वास्तुशास्त्र पेंटींग" आपल्या परिवारातील घटक बनु शकेल.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238

## मंत्र पुष्पांजली बद्दल थोडंसं.....

अशाप्रकारे "यज्ञेन...." यज्ञाद्वारे मोठ्ठी कार्य सार्थकी लावता येतात ही पूर्वापार परंपरा आहे. या परंपरेप्रमाणे सर्वांना सहभागी करत, अडचणीत मार्ग शोधत, न खचता लोककल्याण कारी प्रकल्प पूर्ण केल्याने संपन्नता ( कुबेर म्हणजे संसाधन विपुलता) राहील आणि संपूर्ण पृथ्वीवर सार्वभौम प्रजाहितकारी राज्य पसरेल.


असा हा मंत्र पुष्पांजली चा इतिहास आणि आशय आहे. एकत्र येऊन सर्व कल्याणासाठी यज्ञ करा हा सुख संपन्न समाज, देश आणि विश्व बनवण्याचा परंपरा प्राप्त मार्ग वारंवार मनावर बिंबवण्यासाठी ही मंत्र पुष्पांजली आहे.

मंत्रपुष्पांजली हे प्राचीन राष्ट्रगीत मानतात.

मंत्रपुष्पांजली शिवाय पूजेची सांगता होत नाही.

क्रमश:

## शब्दांची गुंतवणूक




**ज्योतिर्मय साहित्य**

शब्दांची गुंतवणूक ? आश्चर्य वाटले ना ! गुंतवणूक पैशाची होते, सोन्याची होते किंवा शेती, घर, जमीन यासारख्या मालमत्तेची होते पण शब्दांची गुंतवणूक कशी शक्य आहे ? तर संत तुकाराम महाराज म्हणतात

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ।।१।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन जनलोका ।।२।।
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।
शब्दचि गौरव पूजा करु ।।३।।

शब्द इतके मौल्यवान आहेत की शब्दांनाच ते रत्न म्हणून संबोधतात. जेव्हा समाजाला काही सांगण्याची वेळ येईल, त्यावेळी त्याच शब्दांचा शस्त्र म्हणून आम्ही वापर करू. शब्दच आमचे जीवन आहेत आणि हेच शब्दरूपी धन आम्ही लोकांना वाटू. शब्द हेच परमेश्वर आहेत असे सुंदर विचार या अभंगात तुकाराम महाराज व्यक्त करतात.



२३ एप्रिलला आपण जागतिक पुस्तक दिन साजरा करतो. तर शब्दात म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या पुस्तकात आपण ही गुंतवणूक करतो का ? हा प्रश्न या निमित्ताने मनात आला. पुस्तकांमध्ये मोठे विचारधन दडलेले आहे. परवा सहज चिकन सूप फॉर द सोल हे पुस्तक वाचत होतो. त्यात एक सुंदर कथा वाचायला मिळाली.

एक समाजशास्त्राचे प्राध्यापक असतात. ते आपल्या विद्यार्थ्यांना एका झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांचा सर्वे करायला सांगतात. त्या झोपडपट्टीत साधारणपणे २०० मुले राहत असतात. ही कॉलेजमधील मुले जाऊन त्या भागाचा सर्व्हे करतात. त्या मुलांच्या आणि त्यांच्या पालकांच्या भेटी घेतात आणि आपला अहवाल सादर करतात. त्यांच्यापैकी बहुतेक विद्यार्थी असे लिहितात की ही झोपडपट्टीतील मुले सुधारण्याची फारशी शक्यता नाही. आपल्या आयुष्यात ते फार पुढे जाऊ शकणार नाहीत किंवा प्रगती करू शकणार नाहीत. प्रत्येक जण आपल्या अहवालात अशाच प्रकारचे नकारार्थी मत मांडत असतो.

पुढे आणखी २५ वर्षांनंतर त्या महाविद्यालयात दुसरे प्राध्यापक येतात. ते आपल्या विद्यार्थ्यांना २५ वर्षांपूर्वी आधीच्या विद्यार्थ्यांनी ज्या मुलांचा सर्व्हे केला होता, त्यांची काय परिस्थिती आहे किंवा आता ते काय करीत आहेत हे पाहून यायला सांगतात. आता त्या २०० मुलांपैकी साधारण वीस मुले तेथे नसतात. काही मुले काही कारणाने बाहेर गेलेली असतात, कोणाचा मृत्यू झालेला असतो. उरलेल्या १८० विद्यार्थ्यांपैकी बरेच विद्यार्थी मात्र चांगले शिकतात. काही पदवी परीक्षेपर्यंत पोहोचतात तर काही डॉक्टर वकील इंजिनियर होतात, काही चांगल्या अधिकार पदावर काम करताना आढळून येतात. हे सगळे पाहून त्या प्राध्यापक महोदयांना मोठे आश्चर्य वाटते. जी मुले आयुष्यात काही करू शकणार नाहीत किंवा त्यांच्यापैकी बरेचसे जण गुंड किंवा गुन्हेगार होतील असे वाटत असताना ही आश्चर्यकारक सुधारणा कशी काय झाली याचे नवल त्यांना वाटते.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शिष्यलक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

धर्माच्या बाबतीत जो अति कंजूसपणा करतो,जो लोकांशी सरळ बोलत नाही, सरळ वागत नाही, जो दुसऱ्याशी सतत मत्सराने वागतो,त्याला परमेश्वर भेटत नाही। जो सदैव खोटे बोलतो,थापा मारतो,ज्याचे बोलणे मायावी व


वरवरचे वाटते, कोणंतेही काम, वागणे, बोलणे मनापासून नसते. आचारात विचारात ज्याचा मेळ बसत नाही. असल्या वरवरच्या दांभिक लोकांवर परमेश्वर विश्वास ठेवत नाही. विंचू, साप,चावणारा कुत्रा हे प्राणी जसे केव्हाही माणसाचा चावा घेण्यास तत्पर असतात, तशाच प्रकारची माणसाचीही व्रुती असते, नियत असते ते केव्हाही माणसाला शब्दाने बोलून घायाळ करतात। शब्दाचे बोल ऐवढे जिव्हारी असतात की समोरचा माणूस या शब्दरूपी बाणानेच घायाळ होतो. अंत:करणास जखमा होतात तर असा माणूस भगवंताला आवडत नाही. सतत चांगलेच बोलावे चांगलेच वागावे अशी समर्थाची शिकवण आहे.

जो स्वतः चे अवगुण झाकून ठेवतो पण दुसऱ्यांना दु:ख द्यायला जो केव्हाही मनापासून तयार असतो, कठीण शब्द बोलतो, ज्याच्या अंगी जे गुणदोष नसतात ते जो खोटेपणाने त्याच्यावर लादतो. दुष्ट माणसाला दुसऱ्या चे दु:ख कळत नाही. दु:खी असलेल्या माणसाला तो अधिक दु:ख देतो,इतकेच नाही तर दुसऱ्या चे कष्ट पाहून

१. त्याला आनंदच मिळतो.अशा माणसाला भगवंत भेटत नाही.खरं पहायला गेलं तर दुष्ट माणूस स्वत:च्या दु:खाने मनात कष्टी असतोच पण दुसऱ्या चे दु:ख बघून तो हसतो,त्याला बरे वाटते.

(क्रमशः)

## सत्संगतीच्या योगे मन पैक्यावर गुंतून राहात नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

संतांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते; ते बोलतील ते खरे होते. वाचासिद्धी म्हणतात ती हीच. या सिद्धीचा उपयोग आपणसुद्धा करून घेऊ शकतो; परंतु भगवत्सेवा करावी आणि त्याबद्दल पगार घ्यावा, तसे हे होते. कामधेनूवर ओझे टाकावे हे बरे वाटेना म्हणून, वाटेने घोडा येत होता तो घेतला आणि कामधेनू देऊन टाकली, तशासारखे होते. जे सुख चिरकाल टिकणारे नाही ते घेऊन काय करायचे ? हाडांची काडे करून स्वर्गसुख हाती आले, पण कालांतराने ते नाश पावणार; मग ते घेऊन काय करायचे ?

पैक्यासारख्या निर्जीव वस्तूत आपले मन किती गुंतून राहते ! पैसा हा भुतासारखा आहे; त्याच्याकडून काम करवून घेतले तर तो फार उपयोगी आहे. पण ते न केले तर तो उरावर बसतो! आपण प्रापंचिक माणसे; आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. पैशाचा आधार आहे असे वाटणे म्हणजे भगवंताचा आधार नाही असे वाटणे होय. आपल्याजवळचा पैसा आपण होऊन कुणाला द्यावा असे मी म्हणत नाही. पण चोराने तो चोरून नेला तर रडत बसू नये, किंवा कुणी मागायला आला तर त्याला 'नाही' म्हणू नये. त्याला काहीतरी द्यावेच. पैसा प्रपंचाला पुरेसा असावा. म्हणजे किती ? तर पेन्शन असेल त्यांना रोजच्या निर्वाहापुरता असला म्हणजे पुरेसा झाला; आणि पेन्शन नसेल त्यांना साधारण मध्यम स्थितीत दहा-पंधरा वर्षे पुरेल इतका असला म्हणजे पुरेसा झाला. याला अमुक एक असा हिशेब सांगता येणार नाही. आपल्या प्रपंचाला जेवढा जरूर आहे तेवढा पैसा आपल्याला मिळाला, की बस्स झाले. श्रीमंतीला पुष्कळ पैसा लागतो असे थोडेच आहे ? आपल्याला अडचण नाही पडली की आपली श्रीमंतीच आहे ! पैशाच्या बाबतीत आपण प्रयत्न मात्र आग्रहाने करावा, आणि नंतर होईल तसे होऊ द्यावे. आपण आतून निष्काम, निर्लोभ आणि निरिच्छ असावे. दुसऱ्याचे द्रव्य मला यावे अशी बुद्धी कधीही ठेवू नये. ज्याच्याजवळ पैसा विपुल आहे त्याला श्रीमंत अगर सावकार म्हणता येईल; ज्याच्याजवळ विद्वता आहे त्याला विद्वान् म्हणता येईल; ज्याच्याजवळ शेत आहे त्याला शेतकरी म्हणता येईल; परंतु यांच्यापैकी कोणाला मोठा म्हणता येईलच असे नाही. सावकार कंजूष असेल, विद्वान् गर्विष्ठ असेल, किंवा शेतकरी असाच दुर्गुणी असेल. ज्याच्याजवळ सर्व गुण एकसमयावच्छेदेंकरून असतील तोच खरा मोठा होय. सर्व गुण एका भगवंताच्या ठिकाणीच असू शकतील. म्हणून त्याला ज्यांनी आपलासा केला तेच खरे मोठे बनतात. अशा लोकांना संत म्हणतात. आपण संतांचे होऊन राहावे, त्यात आपले कल्याण आहे. सत्संगतीपासून सद्विचार आणि सद्भावना प्राप्त होतात. ज्याचे विचार चांगले तो मनुष्य खरा चांगला होय; आणि जिथे भगवंताचे अनुसंधान आहे तिथे राहणे हीच खरी सत्संगती होय.

पैशाचे नाव अर्थ, पण तो करतो मोठा अनर्थ.

***

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली

***

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

८. अंबानाम-महात्म्य

अंबेच्या दासाशी भय नाही ठावे रे।
मुखी नाम घेता अंबा प्रकटे रे।।
कालिदासाने पूजिली काली
विष्णुदासाने रेणुकामाई
चंद्रहासाने चण्डीभवानी
हित तयांचे करण्या अंबा धावे रे।।
देवादिका माय प्रेरणा देती
लक्ष्मीपती हयग्रीव होती
उतथ्याची ऐंबीज ख्याती
हित तयांचे करण्या अंबा धावे रे।।
मधुकैटभ बंधु इच्छामरणी
नहुषेन्द्र इच्छितो इंद्राणी
महिषासूर वदे गर्ववाणी
अहित तयांचे करण्या अंबा धावे रे।।



## आपल्या शरीराचे वजन प्रमाणातच हवे म्हणजे किती.....?

**ज्योतिर्मय साहित्य**

बीएमआयच्या व्यतिरिक्त पोटाचा घेरसुद्धा लठ्ठपणाचा एक चांगला मापदंड म्हंटला जातो. स्त्रियांमध्ये हा ३१ इंच (८० सेमी) वा त्यापेक्षा अधिक तर पुरुषांमध्ये ३५ इंच (९० सेमी) च्या वर असल्यास स्थूलतेत मोडतो. वजनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम दोन प्रकारात मोडतात- एक चयापचयाशी संबंधित आजार जसे डायबेटीस, कोलेस्टेरॉल, उच्च- रक्तदाब इ. व दुसया प्रकारातील आजार स्थूलतेमुळे हाडं व स्नायूंचे आजार- पाठदुखीपासून गुडघे दुखीपर्यंत. या दोन्ही धोक्यांमध्ये तुलना केल्यास चयापचयाशी संबंधित आजार हे थोडेही वजन वाढले तरी आपले डोके वर काढतात, तर हाडांच्या व स्नायूंचे आजार वजनातील लक्षणीय वाढीनंतरच होतात. आपल्या शरीराचे वजन वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे येऊ शकते. त्यामध्ये अक्षरशः किलो-दीड किलोचाही फरक पडू शकतो. त्यामुळे शक्यतो वजन मॉनिटर करतांना एकाच वेळी ऐकाच काट्यावर वजन करावे.

१८ ते २० वयानंतर आपली उंची स्थिरावते व हाडांची वाढ थांबते. त्यामुळे या वयात जे वजन असते (जर ते 'अति' प्रमाणात नसेल तर) ते आपल्या शरिराला सहजपणे पेलवते. सामान्यत: एक समज आहे कि वयाबरोबर वाढणारे वजन हे शरीराला सहजपणे पेलवता येते, पण या वाढणा-या वजनालाही ५ किलोपर्यंतची मर्यादा असते. म्हणजेच तुमच्या अठरा ते विसाव्या वर्षाच्या वजनापेक्षा जर तुमचे वजन ५ किलोपेक्षा अधिक असेल आणि जरी ते उंचीला प्रमाणशीर असेल तरीही ही लठ्ठपणाची सुरवात ठरू शकते. उदाहरणादाखल एखाद्या अतिशय काटक स्त्रीचे अठरा ते विसाव्या वर्षीचे वजन ४५ किलो आहे व दहा वर्षानंतर ते ६० झाले, तर ती लठ्ठपणातच मोडते. तिच्या उंचीनुसार योग्य वाटणारे हे वजन तिच्याकरता धोकादायक असू शकते. त्यामुळे बारीक माणसाने आयुष्यभर बारीकच राहावे व जाड माणसाने आयुष्यभर बारीक होण्याचा प्रयत्न करावा.

डॉ. यशपाल गोगटे, एंडोक्रिनॉलॉजिस्ट (हार्मोन तज्ज्ञ).

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

संसार करून सुखी झाला असा जगाच्या पाठीवर एखादा व्यक्ती दाखवा? पूर्वी राजे वैभवात असून का राज्य त्यागून वनात निघून गेले असतील? जड भरत यांनी एक कोटी वर्षे राज्य केले, पण एक क्षणात त्याचा त्याग ही केला. अंतःकरणात या संसाराबद्दल निर्ममत्व आले पाहिजे ना.? आमच्या श्रवणाचे विषय माऊली, तुकोबा, राम कृष्ण चरित्र हेच असावेत. भौतिक जगातील कांहींही नसले आणि आता राम माझा झाला ही भावना आली असेल तर, सर्व जग जिंकले असेच होईल. राम कथा म्हणजे केवळ कथा, गोष्ट रंजकता इतकेच नव्हे तर ते कथानक त्या एका गुणावरील केवळ एक वेष्टण आहे.तिथे वेगवेगळ्या भावनाची अभिव्यक्ती होत असते. कोणत्या प्रसंगी कसे वागावे,कसे वागू नये हे निसंदेह कळते ते चरित्र. राम ही व्यक्ती नसून ते एक तत्व आहे. ते जाणून घेण्या योग्य तत्व आहे. त्या प्रति आपण समर्पित ,एकनिष्ठ असावे. आपल्या जवळील दोषांचा त्याग व गुणांची वृद्धी हाच परमार्थ असतो. परमार्थ याची व्याख्या आम्हास माहीत नाही.परमात्म स्वरूपास जाणण्यासाठी जे कांहीं करू ती साधना असते. नाथ महाराजांनी अयोध्या कांडात काय घ्यावे?हे सांगितले आहे. तू राज्यावर बसणार नाहीस हे, कैकयी सांगते म्हणाली. रामास बोलावून आणा हे सुमंताला सांगण्यात आले. रामाचा महालाला १४ दारे होती. प्रभू रामाचे दर्शन व्हावे आणि कृपा व्हावे यासाठी या चौदाही दारातून आत प्रवेश करावा लागणार होता.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

(क्रमशः)


## फुलमाला....




शिवलिंग फूल (कैलास पती फुल)

शिवलिंग फुलाच्या मध्ये असतो शिवपिंडी सारखा आकार.
आपले मन भावूक होते हा पाहता दैवी चमत्कार..
रोप लावल्यावर बारा वर्षांनी या झाडावर फुल फुलते.
अशी मान्यता आहे हे शंकरास वाहिल्याने मनोकामना पूर्ण होते.
या झाडाची फळे तोफेच्या गोळ्यासारखी असतात गोल आणि कणखर.
या वृक्षावर मधमाशा,भुंगे आणि अनेक पक्षांचा असतो सुरेल वावर...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### सहजपाठ : रवींद्रनाथांची अनमोल देणगी (२)

नलू चल. तालवनाची हिच वाट. पलीकडे तिळाचे शेत आणि तिथून पुढे मोहरीचे. पुढे तळे लागते. निळे निळे पाणी. काठाकाठाला चिखल. जळात किरण कसे झगमग झगमग करतात पाहा. बगळा तसा टुकूटुकू बघतो आणि मासा पकडतो. कुठले रे पाखरू ? अरे ! हा तर पोपट. हा काही बोलतो का रे ? तो बोलतो राम राम हरी... किती सुंदर चित्रे. सगळ्या धड्यातून. मुलांना घराच्या चार भिंती बाहेर नेऊन हिंडवलेले.

रवींद्रनाथ यांच्या सहजपाठात मुलांसाठी जोडाक्षरे शिकणे आणि शिकवणे किती रंजक असायचे त्याचे हे एक सुरेख उदाहरण

" आज आद्यनाथ बाबूंच्या कन्येचा विवाह. शल्यपुरातील घरी. कन्येचे नाव शामा. वराचे वैद्यनाथ. त्याचा भाऊ सौम्यनाथ आणि कॉलेजात शिकणारा भाऊ आहे तो धौम्यनाथ...

धौम्य, सौम्य, रम्य, आद्य, वैद्य यासारख्या जोडाक्षर असलेल्या शब्दांची सुरेख योजना केली आहे. म्हणता म्हणता ही जोडाक्षरे सहज लक्षात येतात. तसेच र फार शिकवयला जायचा तोही अतिशय मनोरंजक पद्धतीने.

वर्षा आली. गर्मी सरली. मेघ गर्जना सुरू झाली. पर्वतावरून झरे धावत सुटले. कर्णफुली नदीला पूर आला. वर्षा, गर्जना, पर्वत यासारख्या शब्दात मुलांना रफार सहज शिकायला मिळतात आणि पावसाळ्याचे चिरपरीचीत दृश्यही त्यांच्या डोळ्यासमोर सहज उभे राहते. म्हणता म्हणता आनंद निर्माण होतो आणि आनंदातून शिकणे सहज होते.

या सहजपाठाच्या पुस्तकांमध्ये शांतिनिकेतन मधील प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांनी चित्रे काढली आहेत. पण त्यातील काही चित्रे त्यांनी मुलांनी त्यात रंग भरावेत म्हणून कोरी सोडली आहेत. आपण मुलांना पाठ्यपुस्तकातील चित्रे रंगवू नका, त्यावर काही लिहू नका म्हणून सांगत असतो. पण रवींद्रनाथांनी पाठ्यपुस्तके हीच मुलांना खेळण्यासारखी वाटावी इतकी सुंदर केली. आपण वाचतो त्यात आनंद आहे, मौज आहे असे मुलांना आधी वाटायला हवे. चौथीपर्यंतच्या पुस्तकांमध्ये त्यांनी चतुर्थी, पंचमी, षष्ठी, कर्तरी, कर्मणी यासारखे क्लिष्ट प्रकार ठेवलेच नाहीत. खेळल्यासारखी मुलांनी पुस्तके वाचायची आणि त्यांचा आनंद घ्यायचा. या सगळ्या गोष्टींचा रवींद्रनाथांनी विचार करून त्या या सहज पाठाच्या पुस्तकांच्या निमित्ताने प्रत्यक्षात आणल्या. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने गुरुदेव आहेत.

या संदर्भात आपल्याकडील शिक्षणाबद्दल आणि रवींद्रनाथांबद्दल बोलताना पुलं लिहितात, " गणितासारख्या चिमुकल्या मेंदूंना शेणवणारा विषय शिकवताना त्या गुरुजींनीच किंवा गुरुजीणबाईंनीच म्हणावे – का रे बुवा, जरा कंटाळा आला नाही का ? दोन मिनिटे एखादे मजेदार गाणे म्हणूया. जरा डोक्यातला कंटाळा बाहेर फेकून भांडी स्वच्छ करूया. या नुसत्या कल्पनेनेच आमचे शिक्षणतज्ज्ञ तडकतील. आणि इथे नोबेल प्राईज मिळालेले गुरुदेव रवींद्रनाथ शांतिनिकेतनाच्या आश्रमात शाळेतल्या पोरांना शिकवण्यासाठी भुकेलेले असायचे. आपल्या शैशवाला त्या शिशुसमूहात बसून हा कवी वृद्धत्वी जपत होता. इतकेच नव्हे तर मोठ्यांच्या नृत्य नाटिकांच्या तालमींना देखील प्राथमिक शाळेतल्या पोरांना मुक्तद्वार ! शांतिनिकेतनात आज कुठल्याही समारंभाला सगळ्यात पुढे फ ुलांचा गालीच्या पसरल्यासारखी रंगीबेरंगी पोशाखातील बच्चे मंडळी बसलेली असतात.

(क्रमशः)




# तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलाशी




ज्योतिर्मय साहित्य

काल सकाळी मी वर्तमानपत्र वाचत बसलो होतो. बायको खालीच ताजी भाजी आणायला गेली होती. बेल वाजली म्हणून मी दार उघडले. कामवाली ताई कामासाठी येऊन गेली. नंतर पुन्हा मी वर्तमानपत्र वाचायला बसलो तर माझा चष्मा सापडत नव्हता. मी इकडे तिकडे शोधला. पण सापडला नाही. एका क्षणात कुठे ठेवला? आठवत नव्हते. बायकोला बाहेर वेळ लागला. नक्की कुणीतरी मैत्रीण भेटली असावी याचा अंदाज मी बांधला.

आणि चष्मा शोधण्यासाठी मी सोफा, टेबल, बेडरूम, किचन आदी ठिकाणी फिरलो पण चष्मा काही सापडला नाही. शेवटी स्वतःवर चिडलो. इतक्यात दाराची बेल वाजली. मी दार उघडले. सौ दारात छान हिरव्या भाज्या आणि आणखी काही तरी फळे घेऊन परतली. मी तिला म्हणालो किती वेळ लावलास? तेंव्हा ती म्हणाली, माझी मैत्रीण भेटली होती. छान गप्पा झाल्या दहा मिनिटे. बरे वाटले. मी तिला म्हणलो, अगं, माझा चष्मा सापडत नाहीये, मी सर्वत्र शोधला. तेंव्हा ती हसली आणि म्हणाली, चष्मा आहे तुजपाशी परी तू शोधण्याची जागा चुकलाशी.

मी आणखी चिडलो आणि म्हणालो, अगं बाई स्पष्ट सांग ना? कुठेय तो. तिने मला आमच्या बेडरूम जवळील मोठ्या आरश्याजवळ नेले आणि म्हणाली, बघा जरा आरश्यात. पाहतो तर काय? माझा चष्मा, माझ्याच डोक्यावर होता. आणि माझे मलाच हसू आले. बायकोला सॉरी म्हणालो, उगीच तिच्यावर चिडलो होतो. पुढे सौ म्हणाली, नुसती धांदल करता रोज. मग हे असे होते. आणि मग मी शांततेने विचार केला खरंच धांदल, गडबड केली की काहीतरी चुकतं आणि माणूस मग चुकचुक




करत बसतो. हे तर वस्तू सापेक्ष झाले, पण आनंदाचे असेच असते. फरक एवढाच आहे, आनंद प्रत्यक्ष दिसत नाही पण नक्कीच तो आनंद आपल्या जवळ असतो पण आपण त्याला शांततेने शोधत नाही.

आपल्या जवळ जे आहे त्यात आपण आनंद शोधत नाही तर जे आपल्या जवळ नाही ते हवं म्हणून मनाने दुःखी होतो. मानवी मन असच असते पण जे नाही, आपल्या कुवती प्रमाणे जे मिळणे अशक्य आहे त्याच्या मागे लागतो आणि दुःखी होतो. घरात स्वयंपाकघरात बायको छान स्वयंपाक करते आहे, ती वांग्याची छान भाजी करते आहे. त्याचा घमघमीत वास येतो आहे. कधी तरी कांदा भजी करते आहे त्याचा सुवास आपल्या पर्यंत येतो. ती छान पोळ्या करते आहे. त्या छान फुगल्या आहेत. त्याचा खरपूस वास येतो आहे, आणि अशी गरम गरम पोळी जेव्हा एकदम ताटात येते तेव्हा जिभेला, मनाला आनंद मिळतो पोटाला तृप्ती. हा सर्वात मोठा आनंद नाही का? आणखी आपल्याला चव कळते. याचा अर्थ आपल्या जीभेत अजूनही चैतन्य जिवंत आहे यात आनंद नाही का? रोज भूक लागते. पोट छान खाण्यास परवानगी देते आहे, म्हणजे आरोग्य उत्तम असल्याची ग्वाही नाही का?


घराच्या खिडकीतून बाहेर फ ुललेल्या छान मोगऱ्याचा सुगंध घरात दरवळतो आहे. म्हणजे आपली वास घेण्याची क्षमताअजूनही उत्तम आहे, यात आनंद नाही का? बाहेरून पक्ष्याची किलबिल ऐकू येते आहे. म्हणजे आपले कान चांगले शाबूत आहेत याची ग्वाही मिळते. हा सारा आनंद नाही का? यात सुख नाही का? सृष्टीची सुंदरता बघायला छान डोळे आहेत, चालायला दोन पाय आहेत, यात आनंद नाही का? ज्यांच्याकडे या गोष्टीची कमतरता आहे किंवा अवयवबाधित आहेत, कमजोर आहेत किंवा काम करू शकत नाहीत त्यांच्याकडे बघितले की आपण सुखी असल्याचे नक्की जाणवते. प्रत्येक वेळी घरदार गाडी, बंगले, जमीनजुमला पैसा, यात सुख शोधणे म्हणजे स्वतःला स्वतः निराशेकडे नाही का? माणूस जन्म हा एकदाच आहे. त्यामुळे समाधानात जो आनंद आहे, त्याची तुलना कशाचीच करता येत नाही. कारण आनंदाने राहिलो तर आरोग्य ही आनंदाने हसते आणि जाताना बाकी काही सोबत येणार नाही हे आपल्या सर्वांना माहित आहे. मग जे जवळ आहे त्यात आनंद नाही का? तो आपल्या जवळ नाही का? तर आहे. अर्थात हेच म्हणावे लागेल की

तुझे आहे तुजपाशी
परी तू जागा चुकलाशी.

# मौन...

ज्योतिर्मय साहित्य

माझ्या आजोबांचे रविवारी मौन व्रत असायचे. मला थोडे कळता कळताच ते गेले त्यामुळे का करत होते हे विचारायचे राहून गेले. कदाचित पूर्ण एक दिवस शांत राहिल्याने आपली ऊर्जा वाढत असावी.



खूप राग आल्यावर मौनव्रत धारण करणे केव्हाही चांगले. कारण नकळत रागाच्या भरात आपल्या तोंडातून चुकीचा शब्द बाहेर पडू शकतो. मन उद्विग्न झाल्यावर पण कुणाशीही न बोलता शांत बसल्यावर खूप बरे वाटते. मला वैयक्तिक निसर्गाशी संवाद साधताना कोणाशीही बोलू नये वाटते. मौन बाळगल्याने निसर्गाच्या सौंदर्याचा जास्त आनंद मनाच्या तळापर्यंत पोहोचतो. कधी कधी आपले विचार आपण समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यास असफल ठरतो त्यावेळी मौनव्रत धारण केल्याने थोडे तरी प्रश्न सुटू शकतात. तर कधी कधी आपले सूर समोरच्या व्यक्तीशी जुळत नाहीत असंबंध बडबड ऐकण्यापेक्षा मौन व्रत धारण करणे योग्य असे वाटते.

मौनात थोडा वेळ शांतपणे विचार केला तर आपले काय चुकले किंवा काय बरोबर होते हे कळू शकते. कधी कधी सततच्या कोलाहला पेक्षा मौन व्रत धारण करणे




आपल्या आरोग्यासाठीही हितकारकच आहे. मौनात शांतता समाधान आणि तृप्ती आहे.

पण याची दुसरीही बाजू आहे. काही वेळेला योग्य ठिकाणी आणि योग्य क्षणी आपण न बोलल्याने अनेक गैरसमजुती होतात त्यामुळे अनेक नाती तुटली जातात. अलीकडच्या काळात विसंवाद वाढेल म्हणून अनेक जण मौन राहणे पसंत करतात त्यामुळे एकाकीपणाही वाढत जातो. कुठलेही नाते असो त्यात योग्य संवाद हवाच. एखादी गोष्ट आपल्याला पटत नसली तरीही किंवा चुकीची वाटत असली तरीही बोलून संवाद साधून मग निर्णय घ्यावा. असे माझे वैयक्तिक मत आहे.

मी स्वतः खूप बोलकी आहे. पण बदलता काळ आणि शिकवत जाणारा अनुभव यामुळे कधी कधी मौनव्रत धारण करणे पसंत करते. पण माझी आणि मी जोडलेली जी माणसे आहेत ती माझ्या मौना मधला अर्थ लगेच ओळखून मला बोलते करतात आणि असे प्रत्येकानेच आपल्या जवळच्या व्यक्ती साठी करावे असे मला वाटते. कारण नको त्यावेळी तुम्ही मौन धारण केल्याने तुमच्या जवळच्या व्यक्तीला कायमचे गमावू शकता... अशावेळी मला सुधीर मोघ्यांच्या या ओळी आठवतात.

आभाळ मायेच ओथंबून येईल
सुगंध वारे आप्त होतील
माझा पत्ता विचारीत तुझी
सगळी दान आपसूक येतील
हे घडेल,
नव्हे, घडणारच!
तू फक्त एक सांग –
तेव्हा मी कुठे असेन?









## इंदापूरी निखारे

### बसू चा शहाणपणा...



ज्योतिर्मय साहित्य

प्रवास वर्णने वाचत असतांना, त्याचे फोटो पहात असतांना एक मनस्वी आनंद होत असतो. मुळात एखादा फोटो पाहिल्यानंतर पण एखादी घटना फोटो क्लिक केल्याप्रमाणे क्लिक करतेच. नेहमीच खूप मित्र मैत्रिणींच्या कोठे फिरून आल्यानंतरचे फोटो,माहिती आणि अनेक गमती जमती पोस्ट केलेल्या वाचतो आणि त्याचा आनंद उपभोगतो !

असाच माझा पण एक अफलातून प्रवास! मला औरंगाबाद येथून नागपूरला खूप अर्जंटली पोहोचायचे होते! आणि ५/६ महिन्यानंतर आल्यामुळे मित्र म्हणाले अरे सत्या एवढ्या रात्री का जातोस? रात्री मस्त बसू! सकाळी५ च्या बसने भुसावळला जा, तेथून भरपूर ट्रेन आहेत नागपूरला. आता मस्त बसू! मस्त बसू या शब्दाचा अर्थ आणि आनंद हा खूप उशिरा कळतो. बसू या शब्द तसा अतिशय किरकोळ वाटतो पण अतिशय गहन अर्थ! त्याचा अर्थ बसल्यानंतरच कळतो. झोपेत स्वप्ने पाहतो पण बसल्यावर पण स्वप्नं पाहता येतात!

मीही पाघळलो मनात विचार केला आणि चला बसू या म्हणालो! मित्रांबरोबर रात्रभर पार्टी केली! बसने पोहोचलो भुसावळ मध्ये! दुपारचे१२ वाजले होते रेल्वे स्टेशन वर गेलो आणि ट्रेन नुकतीच गेली होती आणि नंतर ४ वाजता ट्रेन! आमच्या मित्रांनी सांगितले होते की भुसावळ येथून तासातासाला ट्रेन आहेत आता बसू या शब्दामूळे मला त्या वाक्यातील गहन अर्थ समजला! बस पाहिली ती ८ वाजता होती, ट्रेनचे रिझर्वेशन करायला गेलो तर नाही मिळाले आणि या सगळ्या धावपळीत २ वाजले! जेवण केले आणि काय करावे याचा विचार करत असताना एक हमाल दिसला! त्याला काही हिंदी मध्ये, काही मराठीत, काही इंग्लिश मध्ये वाक्य बोलून, नाटक करून मला किती अर्जन्सी आहे ते सांगितले. आणि त्यामुळे त्याला पटले...

ही घटना ८७ सालामधील आहे. हमाल म्हणाला साहेब काळजी करू नका, मी तुम्हाला झोपायला बर्थ देतो! मी खूश झालो, त्याला विचारले पैसे किती घेणार? त्याने ४० रुपये द्या म्हणाला मी ओके म्हणालो!

त्याने लगेच माझी बॅग घेतली मला एका ठिकाणी उभे केले आणि सांगितले येथून कोठे जाऊ नका मी ट्रेन यायच्या आधी ५ मिनिटे येईल. आयुष्यात पहिल्यांदा रेल्वे स्टेशन वर हमालांच्या महत्वाची जाणीव झाली. ट्रेन आली, त्यांनी जागा झोपायला मिळवून दिली.

त्याने एका पोलिसाला सांगितले हे खूप मोठे साहेब आहेत. ह्यांना झोपायला बर्थ द्या, नागपूरला उतरणार आहेत. माझ्या कडे पहात पोलीस मामा अतिशय आदराने म्हणाला, या साहेब...

मी दिलेल्या पैशयामधून त्याला २० रुपये दिले.

पोलिसांनीच माझी बॅग घेतली, पोलिसी खाक्यात गर्दीला बाजूला केले आणि मला म्हणाला, या साहेब आपण येथे बसा झोप येईल तेव्हा झोपा.या सर्व धावपळीत पूर्ण थकलो होतो मस्तपैकी झोपून गेलो!

.रात्री १२ ते १च्या दरम्यान जाग आली पोलीस पण बाजुला बसलेला होता.

पोलिसांना म्हणालो चहा घेऊ, सिगरेट पण पिऊ.

पोलिसांनी चहावाल्याला बोलाविले आणि सिगरेट पिण्यासाठी म्हणून दरवाज्या पाशी जाऊ लागलो! जसा मी उठलो, बाहेर निघालो, सगळे प्रवासी भराभर रस्ता करून देत होते! आता मी पण मस्त मस्तीमध्ये! पोलीस मला साहेब साहेब म्हणत असल्यामुळे लोकांना पण मी मोठा साहेब असणार असे वाटत असेल! पोलिसाला सिगरेट पिऊन झाल्यावर म्हणालो नागपूर आले की मला उठवा मी परत झोपतो आणि माझ्या जागेवर जाऊ लागलो. अगदी रुबाबात! सगळे प्रवासी भराभर बाजूला झाले

आणि मी माझ्या जागेवर जाणार आणि झोपणार

तेवढ्यात इतकावेळ मी जेथे झोपलो होतो त्याच्या बाहेर एक बोर्ड पाहिला आणि बाहेरच थांबलो!बोर्ड होता

कैद्यांसाठी असणारे रेल्वे जेल...

माझी सगळी झोप उडाली आणि मग मी बाहेरच उभा राहिलो! थोड्यावेळाने पोलीस आला मला बाहेर बघून म्हणाला झोपा ना साहेब आरामशीर, मी नागपूर आले की उठवतो आपल्याला...

मी हळूच डोळ्याच्या कोपऱ्यातून आजूबाजूला पाहिले!

काही प्रवासी मला खुप मोठा साहेब समजत होते!

आणि काही प्रवासी मला खुप मोठा गुंड समजत होते!

आणि मी इकडे तिकडे बघत नागपूर यायची वाट बघत होतो! बसू या मध्ये जे जे मित्र होते त्यांना शिव्या देत देत...

# क्षितिजगामी...

**ज्योतिर्मय साहित्य**

क्षितिजगामी : एक प्रवास अपराजित जिद्दीचा...हे आत्मकथन म्हणजे नीता चापले - भोयर या महिला क्रिकेट राष्ट्रीय खेळाडूच्या संघर्षमय आणि अनेकांना प्रेरणादायक ठरणाऱ्या खेळाडूची यशोगाथा.

सुप्रसिद्ध राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू, नागपूर विद्यापीठाच्या कर्णधार, लेखिका, मार्गदर्शक, निवड समिती सदस्य, महिला क्रिकेट प्रशिक्षक, पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन, जलतरणपटू, नीता ताई चापले ( भोयर ) मुंबई यांनी लिहिलेल ''क्षितिजगामी : एक प्रवास अपराजित जिद्दीचा'' हे आपल्या संघर्षमय अशा आयुष्यावर लिहिलेल आत्मकथन नुकतच वाचण्यात आलं.

नीता ताईनी हे पुस्तक मला पाठविल्याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानतो आणि कृतज्ञता व्यक्त करतो.

यश कुणाला नको नसत...

प्रत्येकजण यशस्वी होण्यासाठी, आपले स्वप्न, ध्येय सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्न करीत असतो, धडपडत असतो. त्यामधले बोटावर मोजण्या इतपतच आपल्या इच्छीत ध्येयापर्यंत पोहोचत असतात तर काहींचे स्वप्न हे स्वप्नच उरतात.

''क्षितिजगामी : एक प्रवास अपराजित जिद्दीचा'' या पुस्तकाच्या लेखिका नीता ताई चापले यांचा हा संघर्षमय, प्रेरणादायी असा प्रवास तुमच्या अपूर्ण स्वप्नांना पुर्ण करण्यास आणि तुमच्यामधल्या सुप्त शक्तीना जाग करण्यास नक्कीच मदत करणारा आहे.

फिनिक्स पक्ष्याचा राखेतून पुर्नजन्म होत असतो अगदी त्याचप्रकारे तुमच्यामधल्या ऊर्जेला, तुमच्या स्वप्नांना यशाच्या शिखरावर नेऊन ठेवण्याचे सामर्थ्य नक्कीच या पुस्तकामध्ये आहे.

या पुस्तकाच्या अंतरंगात प्रवेश करण्यापूर्वी मला रसिक वाचकांना एक गोष्ट सांगावीशी वाटते आणि ती म्हणजे हे पुस्तक भलेही आपणाला यशापर्यंत नेणार नसल तरी यशाच्या दाराला धडका मारण्याच सामर्थ्य तुमच्या मनात, मनगटात निर्माण केल्याशिवाय राहणार नाही.

लेखिका या पुस्तकात लिहितात, ''लाटा मोठ्या असल्या तरी जिद्द ठाम असेल, तर किनारा लांब नसतो !''


या देशामधल्या समस्त भगिनीसाठी लेखिका लिहितात, ''मी स्वतःला हरू दिल नाही. प्रत्येक स्त्रीच्या आत एक अदृश्य ताकत असते. संकट येतील, शरीर थकून जाईल, पण मन कधीही थकू देऊ नका. कारण लढणाऱ्याच जिंकतात.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यामधील भुयार या शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या मुलीचा एक राष्ट्रीय महिला क्रिकेट खेळाडू ते पॉवरलिपक्टिंग चॅम्पियन, जलतरणपटू होण्यापर्यंतचा हा प्रवास नसून ज्यांना वाटते की, आपण आपल्या आयुष्यात परिस्थितीमुळे काहीच करु शकलो नाही अशासाठी हे पुस्तक नक्कीच ''दीपस्तंभ'' ठरल्याशिवाय राहणार नाही.

लेखिकेचे आजोबा किसना पैलवान हे शेती, मोलमजूरी करता करता कुस्तीही खेळायचे. त्यामुळेच की काय आपल्या आजोबाचे हा खेळाचा गुण लेखिकेमध्ये उतरला. त्यांच्या आजोबाना शिक्षण घेता आले नाही म्हणून त्यांनी आपल्या तीनही मुलांना शिक्षणासाठी नागपूरला पाठविले. लेखिकेचे वडील हरी भोयर. त्यांनी अनेक अडचणीना तोंड देत शिक्षण घेऊन वकील झाले.

लेखिका नीता चापले यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी ही विदर्भातल्या. याच विदर्भातल्या मातीमध्ये त्या घडल्या. केवळ घडल्याच नाही तर यशाची अनेक शिखरे त्यांनी सर केली.

इयत्ता ७ वी मध्ये असताना त्यांनी कबड्डी या खेळाने सुरुवात केली. घरच्यांचा या खेळाला विरोध होताच. योगायोगाने त्या ९ वीला असताना त्यांच्या हाती क्रिकेटची बॅट आली. बॅटिंग आणि विकेटकिपींग त्या करायच्या. हळूहळू त्यांचा खेळ बहरत गेला. कॉलेजमध्ये असताना विविध स्पर्धा खेळण्यासाठी त्या टिमसोबत जात. पुढे नागपूर विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघाचे नेतृत्वही त्यांनी केले.







हा त्यांचा आयुष्याचा प्रवास खरोखरच प्रेरणादायक आणि अनेकांसाठी दिशादर्शक सुद्धा आहे.

पुढे त्यांचा १९९४ साली नितिन चापले सरांशी विवाह झाल्यानंतर त्या मुंबईला गेल्या. मुलगी ऐश्वर्या आणि मुलगा तेजसचा जन्म झाला. तिथे २००५ साली पहिली महिला क्रिकेट अकादमी सुरु केली. हे सार काही सुरळीत चालू असताना वयाच्या १७ व्या वर्षी ऐश्वर्याचे अपघातामध्ये निधन झाले. हा फार मोठा धक्का त्यांच्यासाठी होता. ऐश्वर्याच गेल्याच दुःख मनात ठेवतच त्यांनी या दुःखातून सावरण्याठी ''क्रिकेटची ऐश्वर्या'' हे महिला क्रिकेटवरचे पुस्तक लिहिले. ''नलिनी'' हा प्रातिनिधीक कविता संग्रहामध्येही त्यांच्या कविता समाविष्ट आहेत. शिवाय ''विदर्भाच्या मातीतल्या चैतन्यवाटा'' हे पुस्तकही त्यांचे लवकरच प्रकाशित होत आहे.

वयाच्या ५० व्या वर्षी त्या पॉवरलिपक्टिंग कडे वळल्या. अनेक मेडलही त्यांनी जिंकली. नंतर त्या जलतरणाकडेही वळल्या.

अशी ही त्यांच्या आयुष्याची यशोगाथा आहे. एक मुलगी म्हणून त्यांच्यावर घरचीही बंधने होती. काही जबाबदाऱ्याही होत्या. सातच्या आत घरात हा नियमही होता. पण,म्हणतात ना, इच्छा असली की, त्यातून मार्गही निघत असतो. मुळात तुमच्यामध्ये त्या गोष्टीविषयी आवड हवीच. आणि मनात जिद्द आणि चिकाटी हवी.मन बळकट आणि काहीतरी आयुष्यात मिळविण्याच ध्येयही असाव लागतं.

नीता ताईला क्रिकेट खेळाविषयी आवड निर्माण झाल्यानंतर क्रिकेटच मैदान त्यांना साद देऊ लागल आणि क्रिकेटमध्ये त्यांनी आपल्या खेळाने नागपूर विद्यापीठाच्या कर्णधार पदापर्यंत मजल मारली.अनेक राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी गाजविल्या. कर्णधार म्हणून त्यांनी केलेल्या नाबाद ९१ धावाची खेळीने त्यांच नाव गाजू लागल.

क्रिकेटला अलविदा केल्यानंतर त्यांनी स्वतःची महिला क्रिकेट अकादमी स्थापन केली. मार्गदर्शक आणि निवड समितीचे सदस्यही म्हणून त्यांनी काम पाहिले.अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले.

हे त्यांनी गाजविलेल कर्तृत्व आणि यश सहजासहजी मिळालेल नाही.

त्यासाठी कष्ट आणि सुखाचा त्याग त्यांनी केला. अनेक अडथळ्यावर, वेदनेवर, अपमानावर, टिकेवर मात करीत वयाच्या ५० साव्या वर्षी पॉवरलिपक्टिंग मध्ये सुवर्ण आणि रजतपदकही त्यांनी मिळविले.

त्यांच्या या सोनेरी यशाच कौतुक अनेक सामाजिक आणि साहित्य संस्थानी तर केलच शिवाय नागपूर आकाशवाणी आणि आकाशवाणी मुंबईने त्यांची मुलाखत घेऊन त्यांचा या प्रवासाची कहाणी अनेक रसिक श्रोत्यापर्यंत पोहोचलेली आहे.

या आत्मकथनाला अतिशय सुंदर अशी प्रस्तावना डॉ.प्रमोद मुनघाटे सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली आणि म.रा. साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांची लाभलेली असून डॉ. लीना निकम लेखिका, राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानीत, नागपूर, श्री.विजय भालचंद्र मुनीश्वर अर्जून, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते ॲथेलेटिक्स आणि पॅरा - पॉवरलीफ्टिंग, यांच्या स्नेहपूर्ण अशा शुभेच्छा लाभलेल्या आहेत.

पुनश्च मी महिला राष्ट्रीय खेळाडू आणि आमच्या भगिनी नीता ताईचे मनपुर्वक अभिनंदन करतो.सामान्य ते असामान्य असा प्रवास करणाऱ्या नीता ताई अनेकासाठी प्रेरणादायक आहे.त्यांचा हा खेळाचा, जिद्दीचा, संघर्षाचा प्रवास हा अनेक वाचकापर्यंत पोहोचो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

त्यांच्या पुढील आयुष्यासाठी, खेळासाठी, लेखन कार्यासाठी भरभरुन शुभेच्छा. यशाचा, कर्तृत्वाचा, जिद्दीचा हा प्रवास पुढेही असाच निरंतर चालू राहो आणि इंग्लिस खाडी पोहून जाण्याचे त्यांचे स्वप्न पुर्ण होवो.. हीच श्रीगणेशचरणी प्रार्थना.....

समीक्षण :- राजू गरमडे,ऊर्जानगर. चंद्रपूर.

| | |
|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- क्षितिजगामी : एक प्रवास अपराजित जिद्दीचा |
| लेखिका | :- नीता चापले - भोयर |
| प्रकाशक | :- दिलीपराज प्रकाशन,पुणे. |
| प्रथमावृत्ती | :- जून २०२५ |
| मुखपृष्ठ | :- संतोष घोंगडे |
| प्रस्तावना | :- डॉ.प्रमोद मुनघाटे |
| पृष्ठ | :- २३२ |
| मूल्य | :- ३८०/- |

तुमचे स्वप्न साकारण्यासाठी सहाय्यक ठरणारे हे पुस्तक तुम्हाला हवे असल्यास...

कॉल/व्हाट्सअप : ८१६९९८७९९५ .... वर पेमेंट करुन पुस्तक मिळवा.किंमत : ३८०/- पोस्टल चार्जेस सहित

# आला श्रावणाआला...!

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रावण अर्थातच श्रवण. निसर्गातील प्रत्येक ध्वनी श्रवण करणे व भक्तिरसात चिंब होऊन जाणारा हा महिना. पक्ष्यांचा किलबिलाट सगळीकडे सुरु होतो. पावसाचा समतोल साधणारा हा महिना. मध्येच ऊन पडते तर अचानक पावसाच्या सरी येतात. पाऊस थांबला की, कोवळे ऊन पडते व आकाशात इंद्रधनुष्य दिसते, असा हा ऊन-पावसाचा खेळ पाहावा तो श्रावणातच. त्यामुळेच तर बालकवींनी वर्णंन केले आहे.

श्रावणमासी हर्ष मानसी,हिरवळ दाटे चोहीकडे क्षणात येती सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे

या महिन्यात तर सणांची मालिकाच सुरु होते. दीप पूजनाने सुरुवात होते. घरोघरी स्त्रिया दिव्यांची आरास मांडतात व पूजा करतात. यानंतर येते ती नागपंचमी. भारतीय संस्कृतीचे व परंपरांचे सौंदर्यही अलौकीकच आहे. अतिप्राचीन काळात निसर्ग पूजा महत्वाची मानली जात असे. नागपंचमीला नागाची पूजा करतात. तसेच धर्ती, आकाश, सूर्य, चंद्र, तारे यांच्याबरोबरच आपण गाय, बैल, झाडेझुडपे यांची देखील पूजा करतो. निसर्ग आपल्याला सर्व काही देतो, त्याचे ऋण तर आपण फेडूच शकत नाही. पण कदाचित निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण या पूजा अतिप्राचीन काळापासून करत आलो आहोत.

यानंतर येते मंगळागौर, नववधूच्या हाताने पूजाअर्चा करून मंगळागौर साजरी केली जाते. धरतीच्या कुशीतून उगवलेल्या वेलींना फुलांचा बहर आलेला असतो, ही पानेफुले अर्पण करण्याचा सोहळा म्हणजेच मंगळागौर. ती साजरा करतांना स्त्रिया गाणी म्हणतात, अनेक



खेळ खेळतात व यातूनच आपली परंपरा व संस्कृती जपतात.

श्रावण सुरु झाल्यावर पंधरा दिवसानंतर येते नारळी पौर्णिमा व रक्षा बंधन. या दिवशी कोळी बांधव समुद्रात नारळ अर्पण करतात. बहीण भावाच्या अतूट नात्याचा धागा बांधून ठेवणारा सण म्हणजे रक्षा बंधन. जगाचा पालनकर्ता, सृष्टीकर्ता श्रीकृष्णाचा जन्मही याचं महिन्यातला. हा सण उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. महाराष्ट्रात कृष्ण जन्माष्टमी साजरी केली जाते. बालगोपाल एकत्र येऊन दहीहंडी फोडून उत्साहाने




गोपालकाला करतात.

श्रावणातील सरी कुणाला रेशीम धारा तर कुणाला मायेच्या सरी वाटतात. एकूणच हा महिना माणसाला निसर्गाजवळ नेणारा, निसर्गाच्या प्रेमात पाडणारा आहे. धरतीने हिरवा शालू नेसलेला असतो. फुलांचा सुगंध सर्वत्र पसरलेला असतो. श्रावणाची सांगता होते ती बैलपोळा या सणाने. यादिवशी बैलाला झुल पांघरतात, त्याची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढतात. लहान मुले मातीचे बैल तयार करतात. आजही ग्रामीण भागात या सणाला अनन्यसाधारण महत्व आहे. भारताची संस्कृती, आचारविचार, परंपरा, विविधता याचे संवर्धन करणारा हा महिना आहे. सध्याच्या काळात मुलांना आपल्या संस्कृतीचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. हा वारसा एका पिढीने दुसऱ्या पिढीला देणे गरजेचे आहे.

कवयित्री शांता शेळके यांनी श्रावण मासाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे --

जळ थेंबाने कशी चमकते
सृष्टी ही साजरी
कधी हसऱ्या, कधी लाजऱ्या
आल्या श्रावण सरी



# कौशिक आश्रमच्या शिबिरात ३८४ जणांचे रक्तदान

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने रविवारी आयोजित रक्तदान शिबिरात ३८४ जणांनी रक्तदान केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंहजी उर्फ रज्जूभय्या यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी हे शिबिर आयोजित करण्यात येते.

मित्रमंडळ कॉलनीतील कौशिक आश्रम येथे हे शिबिर भरवण्यात आले होते. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार, प्रथितयश स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. लीना पाटणकर, संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश उर्फ नाना जाधव आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील राऊत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्र सोलापूर आणि जनकल्याण रक्तकेंद्र पुणे यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजिण्यात आले होते.

रक्तदानामुळे ज्याला रक्त मिळते त्याला तर फायदा होतोच, शिवाय जो रक्तदान करतो त्यालाही त्याचे लाभ मिळतात. म्हणून रक्तदान शिबिराचा उपक्रम खूप महत्त्वपूर्ण आहे, असे डॉ. पाटणकर म्हणाल्या. कौशिक आश्रमसारख्या संस्था करत असलेले शिबिर आयोजनाचे कार्य अधिक गतीने पुढे जाईल, असा विश्वास पोतदार यांनी व्यक्त केला.

थॅलेसेमियाच्या रुग्णांना सातत्याने रक्त द्यावे लागते. महाराष्ट्रात जनकल्याण रक्तकेंद्र साखळीमध्ये असलेल्या सर्व रक्तकेंद्रांमार्फत या रुग्णांना आवश्यक ते साहाय्य करण्यासंबंधीची योजना आखण्यात आली असून हे काम या रक्तकेंद्रांमार्फत सुरू झाले आहे, अशी माहिती प्रा. नाना जाधव यांनी दिली.

संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुहासराव हिरेमठ, ज्येष्ठ प्रचारक श्रीधरपंत फडके, रक्ताचे नाते या संस्थेचे राम बांगड तसेच विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिबिराला भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे कार्यवाह राजाभाऊ पानगावे यांनी प्रास्ताविक, नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन आणि मंदार सहस्त्रबुद्धे यांनी आभार प्रदर्शन केले.

## सचिन कदम यांचे ८३ वे रक्तदान

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील वरिष्ठ अधिकारी सचिन कदम यांनी शिबिरात भाग घेत ८३ वे रक्तदान केले. महाविद्यालयात १९९१ मध्ये अकरावीत प्रवेश घेतला तेव्हापासून कर्तव्याच्या भावनेतून रक्तदान करत असल्याचे त्यांनी सांगितल.

# ''शेवटची लाओग्राफिया'' कादंबरी आता इंग्रजीत उपलब्ध

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रसिद्ध साहित्यिक बाळासाहेब लबडे यांची प्रसिद्ध कादंबरी शेवटची लाओग्राफियाचा इंग्रजी अनुवाद 'The Last Folktale' या शीर्षकाने प्रसिद्ध झाला आहे. या अनुवादाचे कार्य ज्येष्ठ अनुवादक डॉ. विलास साळुंखे यांनी केले असून, ही कादंबरी नुकतीच आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्था Authors Press, नवी दिल्ली यांनी प्रकाशित केली आहे.


लाओग्राफिया ही कादंबरी मूळ मराठीत २०२२ साली अथर्व पब्लिकेशन, जळगाव यांनी प्रसिद्ध केली होती. या कादंबरीस मराठीतील अनेक ज्येष्ठ समीक्षकांकडून गौरव मिळाला असून, तिला अनेक राज्यस्तरीय पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

आता ही बहुचर्चित कादंबरी इंग्रजी वाचकांसाठी खुली झाल्यामुळे मराठी साहित्यातील समृद्ध परंपरेचे दर्शन आंतरराष्ट्रीय स्तरावर झाले आहे.

'The Last Folktale' या इंग्रजी अनुवादाला अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांची इंग्रजीत प्रस्तावना लाभलेली आहे, तर मलपृष्ठावरील मजकूर स्वतः अनुवादक डॉ. विलास साळुंखे यांनी लिहिला आहे. विलास साळुंखे यांनी आतापर्यंत मराठीतील जी.ए. कुलकर्णी, कुसुमाग्रज,भारत सासणे,यासारख्या दिग्गज साहित्यिकांच्या कलाकृतींचा अनुवाद इंग्रजीत केलेला आहे. अशा अनुभवी अनुवादकाने ही कादंबरी अनुवादित केलेली असल्यामुळे तिला एक वेगळे महत्त्व आहे.

ही कादंबरी उत्तराधुनिक शैली, मनोविश्लेषण, लोक-सांस्कृतिक दृष्टिकोन यामुळे वेगळी ठरते. 'The Last Folktale' ही केवळ एक अनुवादित कादंबरी नसून, ती मराठी भाषेचे वाङ्मयिक वैभव जगासमोर सादर करणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

या कादंबरीचे स्वागत जागतिक पातळीवरील वाचकांकडून होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या निमित्ताने मराठी साहित्याचे पाऊल आंतरराष्ट्रीय व्यासपीठाकडे टाकले गेले असून, भाषेच्या सीमांना ओलांडत मराठीचा झेंडा उंचावला गेला आहे.ही कादंबरी सर्व आघाडीच्या ग्रंथालयांव्यतिरिक्त, ऑनलाइन पुस्तक दुकाने ((Amazon.in, Flipkart. com, Infibeam.com, Hoemshop18.com, Snapdeal. com, Bookadda.com, Uread.com, Landmark, Ebay.in, IndiaTimes. com, Crossword.in, Naaptol.com




इ.) आणि भारतातील वितरण चॅनेल , प्रकाशक सामग्रीचे जगातील सर्वात मोठे आणि सर्वात विश्वासार्ह घाऊक वितरक सह सूचीबद्ध केली गेली आहे. जगभरातील पुस्तक दुकाने आणि




ग्रंथालय सेवा कंपन्यांशी प्रकाशनाचे सहकार्य आहे. ही कादंबरी भारत, कॅनडा, यूएसए, फ्रान्स, युनायटेड किंग्डम, जर्मनी आणि जपान, बेकर अँड टेलर, बार्न्स अँड नोबल, NACSCORP, एस्प्रेसो बुक मशीन, Adlibris.com, Bertrams, Blackwell, Book Depository, Coutts, Gardners, Mallory International, Paperback Shop, Eden Interactive Ltd, Aphrohead, इत्यादी Amazon वर उपलब्ध आहे. पुस्तक विक्रेते आणि खरेदीदार वरील सर्व ऑनलाइन स्टोअरमध्ये ही कादंबरी उपलब्ध आहे. यापूर्वी बाळासाहेब लबडे यांची सतरा पुस्तके प्रकाशित आहेत. चाळीस पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. हिंदी, गुजराती, आणि इंग्रजी मध्ये त्यांच्या कविता अनुवादित झालेल्या आहेत.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559

# तंत्रज्ञान आणि व्यवसाय




**ज्योतिर्मय साहित्य**

२१व्या शतकात मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव लक्षणीय वाढलेला आहे. माहिती आणि संवादाच्या या युगात तंत्रज्ञान हे केवळ एक साधन न राहता, प्रगतीचे मुख्य साध्य बनले आहे. व्यवसाय क्षेत्रदेखील याला अपवाद नाही. पारंपरिक व्यवसाय पद्धती, उत्पादन प्रक्रिया, विक्रीचे मार्ग, ग्राहकांशी संवाद या सर्वांमध्ये तंत्रज्ञानाने आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. पूर्वी व्यवसाय अधिक श्रमप्रधान आणि वेळखाऊ असायचे. व्यवहारासाठी प्रत्यक्ष भेटी, रोख व्यवहार, जाहिरातींसाठी वर्तमानपत्रे वा पत्रके यावर भर दिला जात होता. पण आज या साऱ्यांची जागा डिजिटल तंत्रज्ञानाने घेतली आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट्स, सोशल मीडियाचा प्रभाव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता () यांसारख्या नव्या तंत्रज्ञानाने व्यवसायाचे स्वरूप आणि गती पूर्णतः बदलली आहे. आज एक लहान व्यावसायिकदेखील फेसबुक किंवा इंस्टाग्रामवरून आपले उत्पादन हजारो ग्राहकांपर्यंत पोहोचवतो. ऍमेझॉन किंवा फ्लिपकार्ट सारख्या प्लॅटफॉर्मवरून देशातील दूरच्या भागात बसून जागतिक पातळीवर विक्री करतो. यामागचे मूळ कारण म्हणजे तंत्रज्ञानाची सहज उपलब्धता आणि त्याचा प्रभावी वापर. तंत्रज्ञानामुळे व्यवसायातील अनेक प्रक्रिया अधिक कार्यक्षम, अचूक व ग्राहकाभिमुख झाल्या आहेत. तसेच नवकल्पनांना चालना मिळाली असून स्टार्टअप संस्कृती उदयास आली आहे. मात्र, याच तंत्रज्ञानामुळे काही आव्हानेही निर्माण झाली आहेत, जसे की बेरोजगारीचा धोका, सायबर सुरक्षेची भीती, आणि डिजिटल अंतर.

तंत्रज्ञानामुळे व्यवसायात झालेले बदल :

स्वयंचलितीकरण (ऑटोमेशन): पूर्वी मोठ्या प्रमाणात मानवी श्रमावर अवलंबून असलेल्या प्रक्रिया आता यंत्रणा, रोबोट्स, आणि सॉफ्टवेअरद्वारे पार पाडल्या जात आहेत. उत्पादन क्षेत्रात रोबोटिक्सचा वापर केल्यामुळे उत्पादन वेगवान आणि अचूक झाले आहे. उदाहरणार्थ, कार उद्योगात असेंब्ली लाइनवर रोबोट्स काम करत असतात, जे दिवस-रात्र थकवा न लागता कार्य करतात.हे केवळ वेळेची बचत करत नाही, तर मानवी चुका टाळून दर्जाही टिकवतो. त्यामुळे कंपन्यांना जास्त उत्पादन करणे व अधिक नफा मिळवणे शक्य होते.

ई-कॉमर्सचा उदय: आज जगभरात ई-कॉमर्सने खरेदी-विक्रीच्या पद्धतीच बदलून टाकल्या आहेत. ऍमेझॉन, फ्लिपकार्ट, मीशो, अजिओ यांसारख्या ऑनलाइन व्यासपीठांनी विक्रेत्यांना जगभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी दिली आहे. ग्राहक घरी बसून कोणतीही वस्तू ऑर्डर करू शकतो आणि ती काही दिवसांत घरी मिळते.यामुळे पारंपरिक दुकानांची गरज कमी होत आहे. विक्रेत्यांसाठी दुकान भाड्याचा खर्च, स्टाफ, वीजबिल कमी होते आणि ग्राहकांना २४७ सेवा मिळते. या बदलामुळे लहान व्यवसायांना सुद्धा जागतिक पातळीवर स्पर्धा करता येते.

डेटा विश्लेषण व कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशीअल इंटेलिजन्स - ): आणि बीग डेटा च्या साहाय्याने व्यवसाय आता ''डेटा-संचालित'' बनले आहेत. ग्राहक कोणत्या प्रकारच्या वस्तू पसंत करतो, कोणत्या वेळेस खरेदी करतो, कोणत्या ऑफरवर प्रतिसाद देतो याचा डेटा संकलित करून कंपन्या योग्य ते निर्णय घेतात.उदाहरणार्थ, नेटफ्लिक्स किंवा ऍमेझॉन सारख्या कंपन्या वापरून ग्राहकांच्या आवडीनुसार शिफारस करतात. त्यामुळे ग्राहकाचा अनुभव वैयक्तिक व समाधानी बनतो. भविष्यात व्यवसायाचे एक महत्त्वाचे अंग ठरणार आहे.

सोशल मिडिया मार्केटिंग: फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब, ट्विटर यांसारख्या प्लॅटफॉर्मवरून कंपन्या ग्राहकांपर्यंत थेट पोहोचू शकतात. अगदी छोटा व्यवसाय सुरू करणारा व्यक्ती देखील एक चांगली सोशल मीडिया स्ट्रॅटेजी वापरून हजारो ग्राहकांशी संपर्क साधू शकतो. व्हिडिओ, पोस्ट, लाइव्ह सेशन्स, रील्स यांचा वापर करून उत्पादनाची माहिती सहज आणि आकर्षक पद्धतीने दिली जाते. पारंपरिक जाहिरातींपेक्षा सोशल मीडिया जाहिरात अधिक कमी खर्चिक आणि परिणामकारक ठरते.

डिजिटल पेमेंट सिस्टीमचा स्वीकार: (युनिफाइड पेमेन्ट्स इंटरफेस), गूगल पे, फोन पे, पेटीएम सारख्या सेवा आज प्रत्येकाच्या हातात आहेत. ग्राहक आणि विक्रेता दोघांसाठीही व्यवहार करणे आता सहज, जलद व सुरक्षित झाले आहे. रोख रकमेची गरज कमी झाली असून व्यवहारांचे ट्रॅकिंगही सोपे झाले आहे. डिजिटल पेमेंटमुळे काळा पैसा, चोरी यांना आळा बसतो आणि व्यवहार पारदर्शक होतात.

क्लाउड संगणन (क्लाऊड कॉम्पुटिंग): पूर्वीच्या काळात माहिती संगणकातच साठवावी लागायची. पण आता क्लाउड तंत्रज्ञानामुळे माहिती इंटरनेटवर सुरक्षित ठेवता येते आणि कुठूनही, कधीही ती उपयोगात आणता येते.हे लवचिक व स्वस्त पर्याय असून, लहान व्यवसायांपासून ते मोठ्या कंपन्यांपर्यंत सगळ्यांना फायदेशीर आहे. क्लाउडमुळे घरून काम (वर्क फ्रॉम होम) करणे शक्य झाले आहे.

ग्राहक सेवा सुधारणा (चाटबॉट्स व ): आज अनेक वेबसाइट्सवर चाटबॉट्स असतात जे २४७ ग्राहकांची विचारपूस करतात. यामुळे ग्राहक तात्काळ उत्तर मिळवू शकतात आणि कंपनीचे विश्वासार्हतेचे प्रमाण वाढते. (कस्टमर रेलशनशिप मॅनेजमेंट) प्रणाली वापरून ग्राहकांशी नाते राखले जाते, त्यांचा इतिहास, पसंती यांचा अभ्यास करून सेवा सुधारली जाते.

हायब्रीड व रिमोट कामाची सुलभता: तंत्रज्ञानामुळे आता घरून काम करणे शक्य झाले आहे. झूम, गूगल मीट, मायक्रोसॉफ्ट टीम्स सारख्या साधनांनी ऑनलाइन मिटिंग्स, सादरीकरणे आणि चर्चा शक्य झाल्या आहेत.या बदलामुळे वेळ व प्रवासाचा खर्च वाचतो, कामाचे तास लवचिक होतात आणि कामाची कार्यक्षमता वाढते.

पुरवठा साखळी व्यवस्थापनात सुधारणा (सप्लाय चैन मॅनेजमेंट): , बारकोड ट्रॅकिंग, (इंटरनेट ऑफ थिंग्स) यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून वस्तूंच्या हालचालीवर नजर ठेवता येते. कोणती वस्तू कुठे आहे, ती कधी पोहोचेल, तिची स्थिती काय आहे याची माहिती व्यवसायांना तात्काळ मिळते.हे व्यवसाय अधिक नियोजित, शिस्तबद्ध आणि वेळेवर सेवा देणारे बनवते.




व्यवसायात तंत्रज्ञानाचे फायदे :

कार्यक्षमतेत वाढ: तंत्रज्ञानाच्या मदतीने व्यवसायातील अनेक प्रक्रिया स्वयंचलित (ऑटोमॅशन) केल्या जात आहेत. उदाहरणार्थ, उत्पादन क्षेत्रात रोबोट्स व मशीनरीचा वापर करून एका तासात जास्त उत्पादन करता येते. संगणक प्रणाली, सॉफ्टवेअर, (इंटरप्रइज रिसॉर्स प्लांनिंग) सारखी साधने वापरून मॅनेजमेंट, अकाउंटिंग, इन्व्हेंटरी यासारख्या गोष्टी अधिक अचूकपणे व जलद पार पडतात. यामुळे मनुष्यबळाची गरज कमी होते आणि मानवी चुका टाळता येतात.

वेळेची बचत: पूर्वी ज्या गोष्टी पूर्ण होण्यासाठी अनेक दिवस लागत होते, त्या आता काही मिनिटांत पूर्ण होतात. ऑनलाइन बँकिंग, डिजिटल पेमेंट्स, ईमेल, व्हिडिओ कॉल्स इत्यादीमुळे व्यवहार जलद होतात. उदाहरणार्थ, ग्राहकांची ऑर्डर प्रक्रिया, स्टॉक तपासणी किंवा अहवाल तयार करणे यासाठी भरपूर वेळ लागायचा, पण आता ते काही क्लिकमध्ये शक्य झाले आहे. वेळ वाचल्यामुळे उद्योजक अधिक कल्पकतेने इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित करू शकतो.

खर्चात कपात: तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसाय चालवताना अनेक खर्च वाचवता येतात. उदाहरणार्थ, ईमेल व व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमुळे प्रवासाचा खर्च कमी होतो. क्लाउड स्टोरेज वापरल्याने कागदपत्रे छापण्याचा व साठवण्याचा खर्च वाचतो. डिजिटल मार्केटिंग हे पारंपरिक जाहिरात पद्धतींपेक्षा खूपच कमी खर्चिक ठरते. शिवाय, स्वयंचलित यंत्रणा वापरल्यामुळे मनुष्यबळाच्या गरजेतील कपातही खर्च घटवते.

ग्लोबल बाजारपेठेचा प्रवेश: तंत्रज्ञानाच्या मदतीने आता कोणताही व्यवसाय स्थानिक मर्यादांमध्ये अडकलेला नाही. इंटरनेटच्या माध्यमातून ई-कॉमर्स वेबसाइट्स, सोशल मीडियावर मार्केटिंग, आंतरराष्ट्रीय पेमेंट गेटवे आणि लॉजिस्टिक सेवा वापरून लहानसा व्यवसायदेखील आंतरराष्ट्रीय ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतो. यामुळे उत्पादनाची मागणी वाढते, महसूल वाढतो आणि स्पर्धा करण्याची क्षमता उंचावते.

नवकल्पनांना चालना: तंत्रज्ञानामुळे संशोधन, निरीक्षण व विश्लेषण करणे सोपे झाले आहे. यामुळे उद्योजक नवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यास सक्षम होतो. स्टार्टअप्स , , ब्लॉकचेन, बायोटेक्नोलॉजीसारख्या नव्या क्षेत्रांत नावीन्यपूर्ण सेवा व उत्पादने निर्माण करत आहेत. 'नवोपक्रमशीलता' ही आता यशस्वी व्यवसायाची ओळख बनली आहे, आणि तिच्यामागे चालना देणारे मुख्य साधन म्हणजे तंत्रज्ञान.

तंत्रज्ञानाचे काही आव्हाने :

बेरोजगारी वाढीचा धोका (स्वयंचलितीकरणामुळे): तंत्रज्ञानामुळे अनेक उद्योगक्षेत्रात स्वयंचलित यंत्रणा (ऑटोमेशन) लागू करण्यात येत आहे. रोबोट्स, सॉफ्टवेअर, यांचा वापर करून कंपन्या कमी वेळात अधिक काम करण्यास सक्षम झाल्या आहेत. मात्र, याचा थेट परिणाम म्हणजे अनेक पारंपरिक कामांची गरज कमी झाली आहे. विशेषतः निम्न-स्तरीय कामे करणारे कामगार, क्लार्क, टायपिस्ट, अकाउंट सहाय्यक यांना नोकऱ्या गमवाव्या लागत आहेत. भविष्यात जर हे प्रमाण वाढले, तर सामाजिक असमतोल व बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होऊ शकतो.

सायबर सुरक्षेचे प्रश्न: जसा डिजिटल व्यवहारांचा प्रसार झाला आहे, तसाच सायबर गुन्हेगारीचा धोका देखील वाढला आहे. हॅकिंग, फिशिंग, डेटा चोरी, ऑनलाइन फसवणूक, मालवेअर हल्ले यामुळे कंपन्या, ग्राहक आणि व्यक्ती आर्थिक आणि माहितीच्या बाबतीत नुकसान सहन करत आहेत. बँक व्यवहार, ग्राहकांची वैयक्तिक माहिती, उद्योगांची गोपनीय कागदपत्रे हे सगळे सायबर सुरक्षेच्या जोखमीखाली येते. त्यामुळे व्यवसायांनी सायबर सुरक्षा यंत्रणा सक्षम ठेवणे आवश्यक आहे, पण ते सर्वसामान्यांसाठी महागडे आणि गुंतागुंतीचे असते.

डिजिटल अंतर शहरी व ग्रामीण भागातील तफावत: तंत्रज्ञानाचा पुरेपूर फायदा शहरी भागात मिळतो, पण ग्रामीण भाग अजूनही अनेक मर्यादांमुळे मागे आहे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी, उपकरणांची कमतरता, डिजिटल साक्षरतेचा अभाव यामुळे ग्रामीण उद्योजक आणि नागरिक आधुनिक डिजिटल सेवा वापरू शकत नाहीत. हे ''डिजिटल डिव्हाइड'' म्हणजेच ''डिजिटल अंतर'' केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक विषमता निर्माण करत आहे. ही तफावत दूर करणे हे सरकार आणि समाज दोघांचेही उत्तरदायित्व आहे.

सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची गरज: तंत्रज्ञान सतत प्रगत होत आहे दर काही महिन्यांनी नवीन सॉफ्टवेअर, हार्डवेअर, प्रणाली येत असतात. अशा स्थितीत व्यवसायांना सतत नवीन तंत्रज्ञान शिकणे, प्रणाली अद्ययावत ठेवणे, कर्मचारी प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. यासाठी वेळ, पैसा आणि मानसिक तयारी आवश्यक असते. सर्व व्यवसाय किंवा व्यक्ती हे सहजपणे करू शकतीलच असे नाही. परिणामी, काही उद्योग मागे पडतात किंवा अपयशी ठरतात.

भविष्यातील संधी:

स्टार्टअप संस्कृतीचा विकास: आज भारत ''स्टार्टअप राष्ट्र'' म्हणून ओळखला जात आहे. माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल सेवा, हेल्थटेक, ॲग्रीटेक, फिनटेक यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये हजारो नवउद्योजक स्वतःचा व्यवसाय सुरू करत आहेत. हे उद्योजक पारंपरिक मार्गाऐवजी तंत्रज्ञानाचा आधार घेतात जसे की मोबाइल ॲप्स, , क्लाउड सोल्युशन्स, ब्लॉकचेन इत्यादी. स्टार्टअप्समुळे केवळ नवकल्पना प्रत्यक्षात येत नाहीत, तर स्थानिक रोजगार निर्मितीही होते. भारत सरकारकडून चालवलेली स्टार्टअप इंडिया, अटल इनोव्हेशन मिशन, मेक इन इंडिया ही धोरणे या नवउद्योजकतेला चालना देत आहेत. भविष्यात ही संस्कृती शिक्षण, आरोग्य, शेती, वित्त, वाहतूक अशा अनेक क्षेत्रांत क्रांती घडवू शकते.

ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा प्रसार: भारतीय समाजाचा एक मोठा हिस्सा ग्रामीण आहे. त्यामुळे देशाचा खरा विकास तेव्हाच होईल जेव्हा तंत्रज्ञानाचा फायदा ग्रामीण भारतालाही मिळेल. सरकारच्या डिजिटल इंडिया, भारतनेट, कॉमन सर्व्हिस सेंटर्स () यांसारख्या योजनांमुळे आता हळूहळू इंटरनेट, मोबाइल सेवा, ऑनलाइन व्यवहार ग्रामीण भागात पोहोचत आहेत. यामुळे शेतकरी, महिला बचतगट, तरुण उद्योजक यांना शिक्षण, माहिती, बँकिंग, बाजारपेठ यांचा थेट फायदा मिळू शकतो. भविष्यात जर ग्रामीण युवक तंत्रज्ञान वापरून शाश्वत व्यवसाय सुरू करू शकले, तर त्यातून आर्थिक समतेचा नवीन मार्ग निर्माण होईल. त्यामुळे तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागात प्रसार हा देशाच्या समग्र विकासासाठी अत्यावश्यक आहे.

हरित तंत्रज्ञानाचा वापर: आजच्या धावपळीच्या तंत्रयुगात पर्यावरण रक्षण हे एक गंभीर आव्हान बनले आहे. वाढती कार्बन उत्सर्जन, जलवायू बदल, प्रदूषण इत्यादी संकटांना उत्तर म्हणून हरित तंत्रज्ञान हवे आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैविक खत, पाणी पुनर्वापर, पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया, इलेक्ट्रिक वाहने, कार्बन कॅप्चर टेक्नॉलॉजी हे सर्व हरित तंत्रज्ञानाचे प्रकार आहेत. व्यवसायांनी जर या पर्यावरणस्नेही तंत्रज्ञानाचा अवलंब केला, तर केवळ पर्यावरणाचे रक्षण होणार नाही, तर दीर्घकालीन टिकाव व विश्वसार्हता देखील प्राप्त होईल.भविष्यात ग्राहक ज्या कंपन्यांना 'सस्टेनेबल' समजतील, त्यांच्याकडे अधिक झुकतील. त्यामुळे हरित तंत्रज्ञान ही एक जबाबदारीसह संधीदेखील आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचा वापर: भविष्यात व्यवसायाचे भवितव्य मोठ्या प्रमाणावर आणि मशीन लर्निंगवर अवलंबून राहील. ग्राहकांच्या वागणुकीचा अंदाज घेणे, उत्पादनाची मागणी भाकीत करणे, ग्राहक सेवा, अचूक डेटा विश्लेषण करणे अशा अनेक बाबतीत व्यवसायांना मदत करत आहे. चा वापर करून कंपन्या अधिक वेगाने, अचूक आणि व्यक्तिगत सेवा ग्राहकांना देऊ शकतात. हे तंत्रज्ञान केवळ मोठ्या कंपन्यांसाठी नाही, तर लघु आणि मध्यम उद्योगांसाठीही उपयुक्त ठरत आहे. भविष्यात हे प्रत्येक व्यवसायाचे अनिवार्य अंग होणार आहे.

डेटा विश्लेषण आणि बिग डेटा: डिजिटल व्यवहारांमुळे दररोज कोट्यवधी डेटा तयार होतो. या डेटामधून व्यवसायासाठी उपयुक्त माहिती शोधणे ही एक महत्त्वाची गरज बनली आहे. बिग डेटा ॲनालिटिक्सच्या सहाय्याने कंपन्या ग्राहकांच्या आवडीनिवडी, खरेदीची सवय, बाजारातील ट्रेंड समजू शकतात.हे विश्लेषण वापरून कंपन्या अधिक चांगले निर्णय घेतात, योग्य धोरण आखतात, आणि उत्पादन व सेवांमध्ये बदल करू शकतात. भविष्यात, 'डेटा' हेच प्रत्येक व्यवसायाचे इंधन असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

आभासी वास्तव आणि वाढीव वास्तव: आणि या आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर अनेक व्यवसायांमध्ये वाढत आहे विशेषतः शिक्षण, पर्यटन, वास्तुव्यवस्था (रिअल इस्टेट), आरोग्यसेवा आणि गेमिंगमध्ये.उदाहरणार्थ, ग्राहक एखादे घर खरेदी करण्याआधी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्या घराचे आभासी दर्शन घेऊ शकतो. फॅशन किंवा फर्निचर खरेदी करताना वापरून वस्तू स्वतःकडे कशा दिसतील, हे अनुभवता येते.भविष्यात ही दोन्ही तंत्रज्ञानं ग्राहक अनुभव वाढवण्यासाठी अनिवार्य ठरतील आणि व्यवसायांना नव्या उंचीवर घेऊन जातील.

ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा उदय: ब्लॉकचेन ही केवळ क्रिप्टोकरन्सी पुरती मर्यादित राहिलेली नाही. आज अनेक व्यवसाय त्याचा उपयोग डेटा सुरक्षितता, व्यवहार पारदर्शकता, पुरवठा साखळी (सप्लाय चैन), ओळख पडताळणी (डिजिटल आयडेंटिटी) यासाठी करत आहेत. हे तंत्रज्ञान 'डिस्ट्रिब्यूटेड' स्वरूपात असल्यामुळे कोणतीही माहिती छेडछाडविना सुरक्षित ठेवली जाते. भविष्यात सरकार, बँकिंग, आरोग्य, विमा, शिक्षण, लॉजिस्टिकसारख्या क्षेत्रांमध्ये ब्लॉकचेनचा मोठ्या प्रमाणावर वापर होईल.

स्किल डेव्हलपमेंट आणि डिजिटल साक्षरतेचा प्रसार: तंत्रज्ञान झपाट्याने बदलत असताना, त्या अनुरूप कौशल्यांची गरज वाढत आहे. भविष्यातील यशस्वी व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये डिजिटल कौशल्ये, डेटा विश्लेषण, व मशीन लर्निंगचे ज्ञान, सायबर सुरक्षा, डिझाईन थिंकिंग इत्यादींची जाण आवश्यक ठरेल. त्यासाठी सरकार, शैक्षणिक संस्था आणि खासगी कंपन्यांनी पुढाकार घेऊन नव्या पिढीला स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम्सद्वारे तयार करणे गरजेचे आहे. डिजिटल साक्षरता ही आता एक पर्याय नसून गरज बनली आहे.

सायबर सुरक्षेची मजबुती: भविष्यात सर्व व्यवहार, माहिती व व्यवहार डिजिटल स्वरूपात होतील, त्यामुळे सायबर सुरक्षेला महत्त्व प्राप्त होईल. बँकिंग, ई-कॉमर्स, हेल्थ डेटा, सरकारी दस्तऐवज यांसारख्या गोष्टी सुरक्षित ठेवण्यासाठी आधुनिक सुरक्षा उपाय आवश्यक ठरतील. व्यवसायांना भविष्यात 'सायबर सिक्युरिटी इन्फ्रास्ट्रक्चर'वर गुंतवणूक करावी लागेल. एक सुरक्षित डिजिटल वातावरण हे व्यवसाय वृद्धीचे महत्त्वाचे अंग बनेल.

तंत्रज्ञान आणि व्यवसाय हे आता परस्परावलंबी झाले आहेत. जे व्यवसाय तंत्रज्ञानाशी जुळवून घेतील, तेच भविष्यात टिकतील. यामुळेच, प्रत्येक उद्योजकाने तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे, त्याचा योग्य वापर करणे आणि सतत नवकल्पनांच्या शोधात राहणे अत्यंत गरजेचे आहे. व्यवसायातील यशाच्या शिडीवर चढण्यासाठी 'तंत्रज्ञान' हेच आधुनिक काळातील महत्त्वाचे पायरी आहे.

***

# शाळा सुटली, पाटी फुटली...

**ज्योतिर्मय साहित्य**

काळ्याकुळकुळीत, कोऱ्या पाटीचा आठव मनातून जाणं शक्यच नाही. तिच्या बळावर रचलेल्या पायावरच तर पुढची इमारत उभी राहिली आहे. पण त्यामागे हे कष्टकरी हात आहेत, हे आज दिसलं, पाहिलं. अशा काही उदात्त सामाजिक कार्यासाठी सोशल मीडियाला धन्यवाद. (उगीच टीकेसाठी टीका कशाला?)

किती एकतानता आहे ह्या निर्मितीत. एका पाटीच्या निर्मितीत किती जणांचे हात लागताहेत. किती जणांना रोजगार मिळतोय.

मात्र हे पाहून आमच्या पिढीपर्यंतचा कोणी नास्तािल्जिक झाला नाही, तरच नवल.

प्राथमिक शाळेची चौथीपर्यंतची नवी वर्षं, नवी बालभारती, नवी पाटी आणि जोडीला पांढऱ्याशुभ्र खडूचा खोका, त्यातून सांडणारा भुसा, इवलीशी स्पंज पेटी, लाकडी पट्टी असा जामानिमा. हिच्यावरच आधी आडव्यातिडव्या रेषा काढल्या.

नंतर तिसरी-चौथीत आली डबल-पाटी. घरचा अभ्यास आतल्या बाजूला जपून ठेवणारी.

पाटीचं आणि पर्यायानं शाळेचं, अभ्यासाचं ओझं कधीच वाटलं नाही. कोणीच वाटू दिलं नाही. प्राथमिक शाळेपर्यंत तर नक्कीच.

पाचवीत इंग्लिशचं कॅपिटल, स्मॉल एबीसीडी देखील सरावासाठी आधी पाटीवरच गिरवलं. अगदी रुळानं चार ओळी आखून. इंग्लिशची अशी सुरुवात करूनच आज आमच्यातले अनेक जण इंटरनॅशनल झालेत. निमशहरी गावातल्या कामकरी आणि खेड्यातल्या कष्टकरी अशा आमच्या पालकांनी, शिक्षकांनी आणि व्यवस्थेनंही जागतिक भाषेचा बागुलबुवा केला नाही. ह्या काळ्या पाटीनंच, काळ्या आईसारखा आमचा पाया भक्कम करून




आमची मुळं घट्ट रुजवली.

अशी धूळपाटी तयार करणारे अनेक हात आजही राबताहेत, धुळाक्षरं गिरवणाऱ्या इवल्या हातांसाठी. पाचही महाभूतांना एकत्र करून निर्माण करत राहिले आहेत ते काळाचा पट. हे कामकरी नाहीत, हेही शिल्पकारच. पण ही चित्रफीत इतिहासजमा होऊन अर्काइव्ह मध्ये जाऊ नये...

... कारण आता आम्हाला ही काळी पाटी ओझं वाटते. तिची पूजा वगैरे म्हणजे तर भाकडकथाच.

तंत्रज्ञानाच्या दृष्टीनं आता ही पाटी सोयीची वाटत नाही. म्हणून अत्याधुनिक जगातल्या , नावं धारण केलेल्या पिढीच्या इवल्या हातांमध्ये आम्ही देऊ केली आहेत महागडी गॅझेट. ज्यांची निर्मिती करत आहेत यंत्रमानव...

...आणि त्यासाठी आम्ही हाकलून लावतोय आपल्याच मातीतली निरुपयोगी मातृभाषा, निरुपयोगी काळी पाटी आणि निरुपयोगी कष्टकरी.

शाळा सुटली, पाटी फुटली...



# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची लक्ष्य भेदी छक्कड !

१ ऑगस्ट २०२५ रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती. त्यानिमित्त अण्णा भाऊ साठे यांनी सीमावर्तीयांच्या समस्यांवर लिहिलेली छक्कडरूपी परवडीचे वास्तव दर्शन घडविणारी माझी मैना आजही जैसे थे अवस्थेत आहे. अनेक सरकारे आली आणि गेली. मैनाच्या हालअपेष्टा मात्र कायम आहेत.

अण्णा भाऊ साठे हे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासातील एक सुवर्ण पान आहे. अण्णा भाऊ यांनी कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, पोवाडा, लावणी, गीतलेखन आणि प्रवासवर्णन आदी विविध साहित्यप्रकार सक्षमपणे हाताळले. अण्णा भाऊ जहाल साहित्यिक होते, त्याहून ते अधिक देशभक्त होते. ज्या कष्टकरी वर्गात ते जन्मले, त्याचे वास्तववादी समर्पक चित्रण त्यांनी आपल्या कथा-काव्यांतून केले. सामाजिक समता हा त्यांच्या साहित्याचा धर्म होता. साहित्य निर्मितीसोबतच त्यांनी काही चित्रपटांचे पटकथा लेखनही समर्थपणे केले. भांडवलदारांचा पर्दाफाश करण्यासाठी अण्णा भाऊ यांनी अनेक लोकनाट्ये लिहून ती संपूर्ण महाराष्ट्रात सादर केली. डाव्या विचारसरणीवर त्यांचा अधिक भर होता. खंडित महाराष्ट्राची वेदना मांडणारी अण्णा भाऊ यांची माझी मैना... ही  परवडीची छक्कड खूपच गाजली. परवड शब्दापासूनच पोवाडा हा शब्द आलेला आहे. सीमा भागातील जनता, ती महाराष्ट्रात येवू शकली नाही, तिची परवड अद्यापही संपलेली नाही, म्हणून पोवाडा आणि छक्कड यांची सरमिसळ करून अण्णा भाऊ यांनी माझी मैना... ची केलेली मुद्देसूद बांधणी लक्ष्य भेदी आणि मर्म भेदी म्हणावी लागेल. किंबहुना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या माझी मैना... या छक्कडला सीमाप्रश्नात अडकलेल्या जनतेच्या परवडीचा पोवाडा म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. छक्कड म्हणजे सहा कडव्याची रचना अशा अर्थाने हा परवड म्हणजे सीमा प्रश्नात अडकलेल्या नागरिकांच्या समस्यांची लयबद्ध मांडणी म्हणावी लागेल.

स्वातंत्र्य उंबरठ्यावर उभे असताना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ नेटाने सुरू राहिली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला धार देण्याचे काम शाहीर आत्माराम पाटील, अमर शेख, अण्णा भाऊ साठे आदी मंडळी करत होती. १ मे १९६० ला संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन झाले खरे; मात्र त्यात बेळगाव, कारवार आणि सीमा भाग नव्हता. गोव्याला स्वातंत्र्य मिळून त्याचे स्वतंत्र राज्य म्हणजे पहिल्यांदा केंद्रशासित आणि आता पूर्ण राज्य झाले. अर्थात, हे सारे काही सहजासहजी घडले नाही. यासाठी प्रचंड मोठे आंदोलन करावे लागले. तुरुंग तुडुंब भरले. सुमारे १ कोटी मराठी भाषक म्हणजे बेळगाव-कारवारचा मराठी भाषक अद्याप संयुक्त महाराष्ट्रात येऊ शकला नाही. या आंदोलनात १४ नोव्हेंबर १९५५ ला मुंबईत फाउंटन येथे १०६ हुतात्मे झाले.१७ जानेवारी १९५६ ला बेळगावात ५ हुतात्मे झाले. काही जखमी झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने राजकीय समीकरणे बदलली आणि काँग्रेसचे पानिपत झाले. अनेक पक्षांना संयुक्त आंदोलन काळात जेवढे राजकीय यश मिळाले, तेवढे पुढे कधीच मिळाले नाही. वैचारिक मतभेदांच्या वर्तुळातून बाहेर पडून खांद्याला खांदा लावून लढलेल्या या पक्षांचे ऐक्यही भविष्यात अपवादानेच दिसले. संयुक्त महाराष्ट्र झाला खरा; पण त्यात बेळगावसह कारवार आदी प्रदेश आला नाही. याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्र अद्याप व्हायचा आहे. ज्याला आपण संयुक्त महाराष्ट्र म्हणतो, तो अद्याप झालेलाच नाही. तो खंडित आहे, असे ज्येष्ठ साहित्यिक आणि अण्णा भाऊ यांच्या साहित्याचे भाष्यकार उत्तम कांबळे म्हणतात, ते खरेच आहे.

**मैना प्रतिकात्मक**

१ मे १९६० नंतर संयुक्त महाराष्ट्रासाठीची आंदोलने कायम राहिली आहेत. आजही अधूनमधून आंदोलने होतात. साहित्य संमेलनात ठराव येतात. केंद्र आणि न्यायालयाच्या दरबारात प्रश्न रेंगाळतो आहे. प्रत्यक्षात संयुक्त महाराष्ट्राचा नकाशा कधी पटलावर येणार हे सांगता येऊ नये, अशी बिकट स्थिती आहे. १९६० नंतरही या मागणीसाठी अनेक लेखक, शाहीर, कलावंतांनी आपली लेखणी आणि वाणी झिजविली आहे. शेवटचा श्वास असेपर्यंत त्यांनी आपापल्या परीने प्रयत्न केले आहेत. त्यात अण्णा भाऊ एक आणि त्यांची अजरामर झालेली माझी मैना... ही एक प्रतिकात्मक छक्कड होय. पूर्वी एवढा सारा उहापोह केला तो एवढ्याचसाठी की, कोणतीही अस्सल कलाकृती केवळ कल्पनेचे फवारे उडविणारी नसते तर ती काळाची, तिच्या परिस्थितीचे एक अपत्य असते. मैना पाहायला गेल्यानंतर तिच्यात ही परिस्थिती कशी ठासून भरलेली आहे आणि अजून ही ती लढणाऱ्यांना कशी प्रेरणा देते, हेही पाहता येते.

१९५८ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समिती च्या प्रचारासाठी ते पायाला भिंगरी बांधून फिरले. याच काळात माझी मुंबई, लोकमंत्र्यांचा दौरा, शेठजीचे इलेक्शन, अकलेची गोष्ट या कलाकृतींद्वारे आणि आपल्या बुलंद आवाजाद्वारे डफावर थाप देत त्यांनी अवघा महाराष्ट्र तापवला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर म्हणजे १ मे १९६० नंतर अण्णा भाऊंनी माझी मैना... ही छक्कडरुपी रचना लिहिली आणि पुन्हा एकदा आपल्या बुलंद वाणी आणि लेखणीने महाराष्ट्र आणि सीमा भाग हादरवून सोडला. कोट्यवधी लोकांच्या काळजात या छक्कडने  जागा मिळवली आणि अजूनही त्यांची छक्कडरूपी रचना काळजात, आंदोलनात फक्कडपणे, भक्कमपणे आपले पाय रोवून उभी आहे.

**फक्कड छक्कड**

छक्कडचा जन्म लावणीतूनच होतो. लावणी लिहिणारेच पोवाडा लिहितात तेच शाहीर म्हणून समोर येतात. हे खरे असले तरी अण्णा भाऊंना लावणीतून छक्कडरुपी परवडीचे वर्णन करणारी ही रचना असा प्रवास का आणि कसा झाला, त्याला कोणती कारणे घडली, हे मात्र अजून कोणी संशोधक सांगत नाहीत. सहा कडव्यांची छक्कड भाऊ फक्कड यांनी मोठ्या प्रमाणात लिहिली, गंभीर विषय मांडण्यासाठी लावणीपेक्षाही छक्कड हा एक प्रभावी काव्यप्रकार ठरला. सादरीकरण आणि शैली या गोष्टींना छक्कडमध्ये खूप महत्त्व असते. शाहीर अमर शेख यांनी हा प्रकार हाताळला. अण्णा भाऊंनीही तो हाताळला. पेशवाईत तमाशा बहरला खरा; पण त्याला सामाजिक अंगाऐवजी रंजनाचे, सौदर्याचे अंग अधिक होते. अण्णा भाऊंनी त्याला क्रांतिकारी लढाईचे आणि आंदोलनाचे स्वरूप दिले, हे नाकारण्यात काही अर्थ नाही.




अण्णा भाऊंच्या मैने कडे पाहताना एक गोष्ट अतिशय स्पष्ट आहे आणि ती म्हणजे, ती मैना बेळगावच्या रूपात आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि नंतरही सर्व सीमाभाग आपण महाराष्ट्राचाच अविभाज्य भाग आहोत आणि महाराष्ट्रातच आहोत, असे समजून लढत होता. या लढाईत बेळगावातही पाच हुतात्मे झाले. महाराष्ट्रात येण्याच्या इच्छेसाठी आणि हक्कासाठी बेळगावच्या मराठी माणसांनी सुमारे तीन दशके जेवढी आंदोलने सातत्याने केली, तेवढी आपल्या देशात इतरत्र तशी अभावानेच झाली असतील. तीन पिढ्या आंदोलने करत आहेत. तुरुंगात जात आहेत. मार खात आहेत. कधीतरी मैना आणि राघू (मुंबई) यांची अतूट अशी गळाभेट होईल, या आशेवर जगत आहेत. आशेला सातत्याने संघर्षाची ऊब देत आहेत. १ मे १९६० नंतर तर ही भावना दोन्हीकडे म्हणजे नावाने संयुक्त बनलेल्या महाराष्ट्रात आणि बेळगावातही तीव्र होती. बेळगाव बाहेरच्या जनतेने आणि नेत्यांनी बेळगाव महाराष्ट्राचाच भाग आहे, असे लढत सांगितले आहे. तुम्ही आमचेच आहात, आमचेच राहणार आहात, अशी आश्वासने दिली होती. पण, हळूहळू या आश्वासनांचा १९६० नंतर विसर पडू लागला किंवा ती पूर्ण करण्याचे राजकीय प्रयत्न अपुरे पडू लागले. सांघिक प्रयत्नही अपुरे पडू लागले. बेळगावभोवती कर्नाटकची मिठी आवळली जाऊ लागली. मराठी माणसाची भाषा, संस्कृती आचार-विचार या सर्वांवर कानडीने हातपाय पसरायला सुरू केले. संयुक्त महाराष्ट्राचे झाले काय, असा प्रश्न तयार झाला. अण्णा भाऊ महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विसेक वर्षे हे पाहत होते.

**महाराष्ट्राचे महास्वप्न**

संयुक्त महाराष्ट्राविषयी अण्णा भाऊंच्या म्हणजे एका कलावंताच्या मनात किती आस लागून राहिली होती, हे लक्षात येते. काहीही झाले तरी संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, असे अण्णा भाऊंनी छातीठोकपणे सांगितले. संयुक्त महाराष्ट्र म्हणजे एक महालढाई, एक महास्वप्न आणि एक महासंघर्ष आहे. तो आपल्या स्वत:चाही आहे, असेच अण्णा भाऊंच्या लेखनावरून वाटते. संयुक्त महाराष्ट्र आणि त्यासाठीची लढाई अण्णा भाऊंनी तारुण्यातच सुरू केली होती. त्यातूनच ते महाराष्ट्राला संयुक्त आणि स्वायत्त करू पाहत आहेत. पण, हे करायचे असेल तर सर्व जनतेला एकत्र केले पाहिजे. महाराष्ट्र हा कोण्या एका जातीचा किंवा पंथाचा नाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ कोणा वर्गाची, कोणा धनदांडग्याची किंवा कोणा एका पुढाऱ्याची नसून, ती मास मूव्हमेंट आहे, हेच अण्णा भाऊ पुन: पुन्हा सांगत होते,

उठ महाराष्ट्रा हो जागा झुगारुनी निद्रा
महाविदर्भ, गोवा, मराठवाडा सारा सांधुनी देश हा।

- लेखक -
डॉ. शेषराव पठाडे,
छत्रपती संभाजीनगर



तीन कोटींचा प्यारा ने पुढे थोर परंपरा।।

**दु:ख अन् संघर्ष**

अण्णा भाऊंच्या साहित्याकडे पाहताना आपली दृष्टी कशी आहे, हे सर्वांत अधिक महत्त्वाचे ठरते. अण्णा भाऊंनी स्वत:च सांगितले आहे की, आम्ही फक्त रंजनासाठी लिहीत नाही... माणसाची दु:खं मांडतो. त्याचा संघर्ष मांडतो. त्याचे प्रबोधन करतो. त्याला व्यवस्थेविरुद्ध लढायला प्रवृत्त करतो. माणूस आणि त्याचा समाज बदलणे, या ध्येयाने ते लिहित राहिले. स्वाभाविकच त्यांच्या प्रत्येक कलाकृतीत या समाजाच्या साऱ्या गोष्टी येतात. पारंपरिक कलेचा त्यांनी चेहरा बदलला. गणात देवाऐवजी माणसाला स्थान दिले. हे सर्व समजून घेतल्यावर मैनेकडे पाहायला पाहिजे. या छक्कडमध्ये प्रेम आहे हे खरे आहे; पण प्रेमकथाच व्यक्त करणारी ही रचना नाही. तिचा चेहरा तसा वाटत असला तरी तिच्या अंतरंगात समाज आहे, संघर्ष, शौर्य आहे, वर्ग आहे, वर्ण आहे, राजकारण आहे, सौंदर्य अलंकार आहेत, सौंदर्याचे वर्णन आहे, राजकारणातल्या खल प्रवृत्ती आहेत, लढाईसाठी ऐक्य साधण्याचे आवाहन आहे आणि हे सारे महाराष्ट्राला संयुक्त करण्यासाठी म्हणजेच बेळगावरूपी मैनेला महाराष्ट्राच्या काळजात प्रेमाचे, आदराचे, हक्काचे आणि असंख्य आश्वासने देऊन मान्य केलेले स्थान देण्यासाठी आहे. या छक्कडरूपी पोवाड्याला केवळ पारंपरिक प्रेमाच्या चौकटीत बसवणे म्हणजे तिच्यात असलेल्या युद्धाच्या धगीची राख करण्यासारखे आहे. अण्णा भाऊंनी अशी कल्पना केली आहे की, अर्धवट संयुक्त महाराष्ट्राचे काळीज बनलेल्या, मुंबईत आपल्यापासून दूर राहिलेल्या किंवा आपण जिला सोबत घेऊन येण्यात अयशस्वी ठरलो त्या मैनेची आठवण होतेय, ती स्वाभाविक आहे. मुंबई म्हणजे महाराष्ट्र आणि बेळगावचे अतूट नाते. सीमाभागात आंदोलन करून परतताना आंदोलक म्हणजे महाराष्ट्र काय-काय आश्वासने देत होता आणि प्रत्यक्षात काय घडत होते, याचे वास्तववादी चित्रण आहे.

**''मैने'' ची लोकप्रियता**

सभा-समारंभाच्या ठिकाणी अण्णा भाऊंचे पोवाडे खूप गाजले. माझी मैना गावावर राहिली... या पोवाड वजा लावणीची लोकप्रियता आजही कायम आहे. या रचनेत अण्णा भाऊंनी खंडित महाराष्ट्राचे वर्णन केले आहे. ते म्हणतात...

गावाकडं मैना। भेट नाही तिची अन् माझी। तीच गत आहे आज या खंडित महाराष्ट्राची।

बेळगाव। कारवार। डांग। उंबरगाव। भालकीवर मालकी दुजाची।

धोंड खंडणीची। कमाल दंडेलीची। चीड बेकीची । अन् गरज एकीची।

म्हणून विनवणी आहे या शिवशक्तीला शाहिराची।

क्रांतदर्शी आशयाची पेरणी!

अण्णा भाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसबंधी लिहिलेली माझी मैना गावावर राहिली ही छक्कड रचना आणि सयुक्त महाराष्ट्र उगवतोय माझ्या सरकारा। खुशाल कोंबडं झाकून धरा हा शाहीर आत्माराम पाटील यांनी रचलेला गोंधळ म्हणजे शाहिरीची दोन नेत्रं आहेत. केवळ लाल बावटा कलापथकात नव्हे, तर अन्य कलापथकांमधून, शाहिरी फुलोऱ्यांमधून ही कवने गायिली जात. माझी मैना गावावर राहिली ही छक्कड संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शेतकरी, कामगार आणि पुढाऱ्यांची प्रेरणा ठरली. खरे म्हणजे ही छक्कड एक रूपक आहे. ही रचना अण्णा भाऊंच्या प्रतिभेचा फुलोरा आहे. गावखेड्यात राहणारी मैना आणि तिच्यासाठी झटणारा मुंबईतला कापड गिरणीतला कामगार, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, कामगारांचे शोषण हे सर्व या रचनेमधून प्रतीत होते. बेळगाव, कारवार, निपाणी, डांग, उंबरगाव महाराष्ट्रापासून तुटून वेगळा पडला. खरे म्हणजे हीच मैना, तिची एकसंध महाराष्ट्रापासून झालेली ताटातूट माझी मैना मध्ये अण्णा भाऊंनी ज्या प्रतिमांचे उपयोजन केले आहे, त्या पाहता परंपरेचा सार्थ अभिमान आहे. पण, तरीही परंपरेत क्रांतदर्शी आशयाची पेरणी त्यांना अपेक्षित आहे. अण्णा भाऊंची सौंदर्यवादी दृष्टी जीवनसन्मुख आहे. ते मैनेचं वर्णन करतात, तेव्हा त्यांची प्रतिभा एखाद्या सौंदर्यवादी कवीसारखी तेजाळून निघते.

ओतीव बांधा। रंग गव्हाळ। कोर चद्रांची।
उदात्त गुणांची। मोठ्या मनाची।
सीता ती माझी रामाची। हसून बोलायची। मंद चालायची। सुगंध केतकी, सतेज कांती, घडी व पुतळी सोन्याची हिरकणी हिऱ्याची, काठी आंधळ्याची। अन् तशीच ती माझ्या गरिबाची। मैना रत्नाची खाण.. नसे सुखाला वाण, तिच्या जिवाची छक्कड मी गायिली....

मैनेचे वर्णन एका बाजूला करतानाच भांडवलदारांच्या मगरमिठीतल्या बकाल मुंबईचे वर्णन ते करतात -

ही मंबई यंत्रांची। तंत्रांची, जगणऱ्यांची।
मरणाऱ्यांची। पैदास इथे भलतीच चोरांची। ऐतखाऊ ।
शिरजोर, हरामखोरांची, भांडवलदारांची।

अण्णा भाऊंना मुंबई जगणाऱ्यांची, मरणाऱ्यांची वाटते, तर पठ्ठे बापूरावांना मुंबई रावणाची लंका वाटते. एका बाजूला अण्णा भाऊंची श्रमिक मुंबई, तर दुसऱ्या बाजूला पठ्ठे बापूराव यांची विलासी मुंबई. अण्णा भाऊंच्या लोकसाहित्यातील योगदानाचे मूल्यमापन करायला माझी मैना... ही एकच रचना पुरेशी आहे.

द्वेषभावविरहित कडवा लढा

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठी भाषेचा कडवा अभिमान लेवून मायमराठी मुलखासाठी, मुंबई आणि कारवार, डांग, बेळगाव संयुक्त

महाराष्ट्राचा भाग बनवण्यासाठी आपली शाहिरी मैदानात उतरवून कडवा लढा देणारे अण्णा भाऊ, मुळात प्रादशिक अस्मितेच्या पुढे गेलेले होते. मराठी भाषिक भाग संयुक्त महाराष्ट्रात यावा, ही भाषावार प्रांतरचनेची तार्किक भूमिका घेऊन ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कम्युनिस्ट पक्षाच्या बाजूने आपली कला घेऊन उतरले होते. पण इतर भाषिक प्रदेशाविरोधात त्यांच्या गाण्यात द्वेषभाव, मत्सर दिसून येत नाही.

सांधुनी मुंबई विशाल महाराष्ट्राला ।।
संयुक्त होऊनी साथ देण्या दुसऱ्याला ।।
शेजारी महागुजरात निर्मायाला।।
आसाम, आध्र, ओरिसा, बिहार, तामिला।।
त्या संयुक्त कर्नाटका आणि केरळा।।
स्वायत्ता देऊनी या साऱ्या घटकाला।।

यातून महाराष्ट्रासह भगिनी राज्यांवर अण्णा भाऊंनी आपला मैत्रभाव जाहीर केला आहे. माझी मैना गावावर राहिली... या संयुक्त महाराष्ट्र चळवळीसदर्भाने लिहिलेल्या छक्कडमध्ये गावावर राहिलेल्या मैनेची आणि मुंबईला कामाच्या शोधात आलेल्या गरीब कामगाराची आणि कारवार, डांग, बेळगाव, उंबरगाव या भागाची संयुक्त महाराष्ट्रापासून झालेल्या ताटातट्टीची विरह-वेदना एकच होऊन जाते. हा व्यष्टीकडून समष्टीकडचा प्रवास एकाच वेळी मुक्तिदायी आणि परात्मीकरणाची वा तुटलेपणाची जाणीव देतो.

छातीवर दगड ठेवून वाट धरली मी मुंबईची।
पर्वा केली नाही उन्हाची। थंडीची, पावसाची।
अन् पाण्यानं भरलं खिसं माझ। वाण मला एका छत्रीची।
त्याच दरम्यान उठली चळवळ संयुक्त महाराष्ट्राची।
अखेर झाली मुंबई महाराष्ट्राची। परी तगमग थांबली नाही माझ्या अंतरीची।
गावाकडं मैना। भेट नाही तिची अन् माझी। तिच गत आहे आज या खंडित महाराष्ट्राची।

मैना गावावर राहिल्याचं दु:ख, अभावग्रस्त कामगार म्हणून मुंबईत होणारी परवड विसरून, बाजूला ठेवून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत स्वत:ला झोकून देण्याची ही तऱ्हा, कामगारांच्या परात्मीकरणाची मोठ्या लढ्यात फना होण्याची रूपकात्मक प्रक्रिया काव्यातून अण्णा भाऊंनी समोर आणली आहे.

सामर्थ्यशाली कवन

आपल्या लेखणी आणि वाणीद्वारे अण्णा भाऊ योद्ध्यासारखे लढत होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या मुंबईचा गिरणी कामगार, मुंबईची लावणी, माझी मैना, कामगार स्तवन अशा अनेक कवनांतून त्यांनी स्वातंत्र्याची कशी वाताहत झाली, याचे भे

दक चित्रण मांडले. अण्णा भाऊ साठे यांच्या कवनात विलक्षण सामर्थ्य होते. याची एवढी धास्ती सरकारने घेतली होती की संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख व द. ना. गव्हाणकर यांच्या कला पथकावर देसाई सरकारने बंदी  घातली होती.

जी छक्कड तमाशात स्त्रियांचे शृंगार किंवा वर्णन करण्यासाठी गायिली जात होती, ती छक्कडरूपी रचना अण्णा भाऊंनी डमडम ची गोळी छातीवर झेलण्यासाठी आणि बिनी मारण्यासाठी रूपांतरित करून शौर्य दाखवून दिले. शौर्याचे, पराक्रमाचे वर्णन पोवाड्यांतून केले जाते, तशाच प्रकारे या आपल्या छक्कडमधून वर्णन अण्णा भाऊंनी केल्याची दिसून येते. माझी मैना गावावर राहिली, ही अजरामर कलाकृती याची साक्ष देत आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार असून, शाहिरी वाड्.मयाचे अभ्यासक आहेत. मो.९६०४८८४०५६)

(क्रमश:)